
MAHMAR 19358/13/1/2009-TC



विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष नववे / अंक ८ / जुलै २०१२

## संपादकीय

### रात्र येते अंधारुनि . . .

पूर्वी रोग प्रतिबंधक औषधांचा प्रतिबंध कमी होत असे. त्यातून प्रतिबंध पुर्णत: झालाच तर मानव जातीला ते वरदान ठरायचे. देवी या रोगाचे उदाहरण आपल्याला चटकन आठवण्यासारखे आहे. देवीची लस माणसाने शोधून काढली. चिकित्सा विज्ञान (मेडिसीन) हे क्षेत्र विकसनशील असताना एडवर्ड जेन्नर यांनी देवीची लस प्रयोग शाळेत तयार केली व 'देवीचा रोगी कळवा आणि हजार रुपये मिळवा' असे आवाहान करणाऱ्या वाक्याचा वापर वाढला.

हे सर्व सांगायचे कारण म्हणजे एखादा संसर्गजन्य रोग वेगाने पसरावा तसे 'ताणतणाव' आज वेगाने वाढत आहे. त्यास प्रतिबंध करणारी कोणतीही लस अद्यापतरी उपलब्ध नाही. व उपलब्ध होईल याची शक्यता नजीकच्या भविष्यात नाही. वयाच्या सर्व गटांमध्ये विविध रूपांत ताणतणाव आहेतच. त्यांची मात्रा कमी अधिक असेल इतकेच.

आपण सध्या भोवळ यावी अशा गतीने आयुष्य जगत आहोत. दैनंदिन जीवनातला निवांतपणा नावालाही आढळत नाही. असंख्य संधी उपलब्ध आहेत. कष्ट करायची तयारी असलेल्या वर्गासाठी कधी नव्हत्या इतक्या संधी डोळ्यांसमोर आल्या आहेत, याचा परिणाम आयुष्याच्या सर्व क्षेत्रांतील टोकाची स्पर्धात्मकता वाढण्यात झाला आहे. सार्थकतेपेक्षा भौतिकता महत्त्वाची ठरायला लागली आहे.

या बदलत्या जीवनशैलीत मानवी अस्तित्वाला असणारे नात्यांचे अधिष्ठान ठिसूळ बनू लागले आहे. नाते संबंधांची वीण उसवायला लागल्यामुळे ताणतणावाच्या ओझ्याखाली दबलेल्या 'माणसाला' या नात्यांतील ऊब मिळेनाशी झाली आहे. मानसिक नात्यांतील ऊब मिळेनाशी झाली आहे. मानसिक औदासीन्यतेमुळे व्यसने वाढत चालली आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने प्रकाशित केलेल्या गतवर्षीच्या एका अहवालात मानवी समूहाला त्रासदायक ठरणाऱ्या पहिल्या पाच रोगांत ताणतणाव व औदासीन्य यांचा समावेश होतो. दर पाच व्यक्ती मागे एका व्यक्तीला आयुष्यात कधी ना कधी औदासीन्याला बळी पडावे लागत आहे. टोकाच्या औदासीन्याचा परिणाम माणसाने आपले जीवन संपवून टाकण्यात होतो. जागतिकीकरणाच्या गेल्या २०-२५ वर्षात तरुण विद्यार्थी व शेतकरी या वर्गातील कष्टकरी यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कल्पनातीत वाढले आहे व वाढत आहे.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

रोजच्या वृत्तपत्रांमध्ये किमान एका तरी तरुण वा तरुणींच्या आत्महत्येची बातमी असते. जग सपाट होऊन आखडत चालेले आहे, त्याचे हे परिणाम आहेत. मानसिकतेवरील या परिणामांचे व्यवस्थित आकलन करून त्यावर उपचार करणारा कोणी 'जेन्नर' निर्माण झाल्याशिवाय हे थांबेल असे वाटत नाही.

'निम्हांस' या भारतातील मानसिक आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या अग्रगण्य संस्थेचा अहवाल असे सांगतो की गेल्या दोन दशकांत व्यसनाचा 'पहिला' अनुभव घेण्याचे वय ३५ वरून १८ वर आले आहे. शालेय वयात तंबाखू चघळणारी ७ वी ८ वी तील पिढी पाहिली की अहवालातील हे निरीक्षण किती सूचक आहे त्याची कल्पना येते. महसुलाच्या मोहापायी शासन संस्था तरुणांचा बळी घेण्यास कारणीभूत ठरत असल्याचे हे चिन्ह आहे. भाबडेपणाने पण प्रामाणिक प्रश्न विचारणारे असे अनेकदा विचारतात, "असे असेल तर ही सर्व व्यसने शासन बंद का करून टाकत नाही? अगदी कोणतेही व्यसन समाजात राहणार नाही याची शासनाने काळजी घ्यायला काय हरकत आहे?" दिखाऊ गोष्टींच्या आधारे आपण पुन: पुन्हा सत्तेवर येऊ असा विश्वास लोकप्रतिनिधींना वाटते. कारण जो तो आपला खुंटा घट्ट करून ठेवतो. दारू तंबाखू वाल्यांशी साटलोट वाढवून स्वत:ची समृद्धी वाढवत असतो. 'जसे लोक, तसे त्यांचे देव' या चालीवर जशी जनता तसे राज्यकर्ते ही वस्तुस्थिती असल्याने, स्वत: व्यसनांमध्ये अडकलेल्या लोक प्रतिनिधींना असे झाले तर 'धक्का' नाही का बसणार?


एका बाजूला हे वाढते अस्वास्थ्य आणि मानसिक औदासीन्य आणि दुसरीकडे त्यावर प्रतिबंध करू न शकणारी, तोकडी व्यवस्था असे हे चित्र आहे. याचा एक परिणाम तथाकथित आध्यात्मिक बुवाबाजी वाढण्यात होत आहे. आपले ताणतणाव आणि औदासीन्य यांवर 'बाबाच' उपचार करू शकतील अशी धोकादायक भाबडी समजूत समाजात वाढत चालली आहे.

ताणतणाव व औदासीन्य या मानसिकतेशी आपल्याला झगडायचे असेल तर बुवाबाजी किंवा बारच्या क्षितिजावर मावळणारे दिवस हे त्याचे उत्तर नाही. तर वेगवान जीवन शैलीचा वेग नियंत्रणात आणणे व कौटुंबिक नाते संबंधांची वीण उसवणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. तसेच मानसिक आरोग्याच्या सुविधा सर्व पातळ्यांवरील लोकांना सहजासहजी उपलब्ध होतील, असे प्रयत्न अधिक जोरकसपणे व्हायला हवेत. नातेसंबंधातील माणसे अशा मानसिक अस्वास्थ्याची लक्षणे सहजपणे ओळखू शकतात. म्हणून कुटुंब व समाजातील ही नात्यांतील वीण घट्ट करायचा प्रयत्न व्हायला हवा. त्याचबरोबर उच्चार व आचार स्वातंत्र्याचा चुकीचा अर्थ पसरवणाऱ्या व त्यातून ताण वाढवणाऱ्या माध्यमांनाही लगाम घातला जायला हवा.

हे जर झाले नाही तर, भोवऱ्यासारख्या गतीने आयुष्याचे फिरणे चालूच राहील आणि तरुणाई व कष्टकरी जीवांच्या गळ्यांभोवतालचे फास दिवसेंदिवस आवळले जातील. व्यसनांना समाज मान्यता तर मिळाली आहेच, माणसे त्यांच्या गर्तेत खोल बुडत जातील हे कटू वाटले तरी वास्तव आहे व समाजाच्या विनाशाची बीजे या वास्तवात दडलेली आहेत.

– मोहन पाठक

●●●



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ७ / जुलै २०१२

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक १ ला)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिन्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | बसच्या टपावरून केम्ब्रिजचे दर्शन | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | उल्लेख निर्देश: अर्थ व संकल्पना | प्रा. श्रीनिवास आठल्ये | ८ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १२ |
| ५) | उत्कर्षाचे साधन (स्वामी रामतीर्थ) | श्री. शं. बा. मठ | १६ |
| ६) | मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर | असीम | २० |
| ७) | साहित्य - जगत | श्री. शरद जोशी | २२ |
| ८) | श्री स्वामी समर्थ केन्द्र, पिंपळभाट, अलिबाग | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | २४ |
| ९) | सावरकरांची काव्य व नाटके | गार्गी अटेकर | २७ |
| १०) | बालकांड | प्राचार्य श्री. मुजुमदार | ३२ |
| ११) | परिसर वार्ता | - संकलित | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रवर्तक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.


- संपादक

# बसच्या टपावरून केम्ब्रिजचे दर्शन

*डॉ. आगरकर यांच्या प्रवासवर्णनांतील हे आणखी एक वर्णन. यात केम्ब्रिज शहराचे दर्शन हा अनुभव आहे बालपणीच ऑक्सफर्ड, केम्ब्रिज बघायला मिळणारी आजची शालेय विद्यार्थ्यांची पिढी सुदैवी आहे, असेच हे वर्णन वाचल्यावर वाटते. आगरकरांची शैली, निरीक्षण आणि बारकावे टिपण्याची पद्धत लक्ष्यवेधी आहेच! - संपादक*

ठाण्यातील प्राच्यविद्या अभ्यास संस्था भारतीय विद्यार्थ्यांसाठी इंग्लंडची शैक्षणिक सहल आयोजित करते. या सहलीमध्ये इंग्लंडमधल्या ऑक्सफर्ड, केम्ब्रिज आणि लंडन या तीन महत्त्वाच्या शहरांना भेटी दिल्या जातात. सुरुवात होते ऑक्सफर्डपासून. तीन दिवसांची ऑक्सफर्ड भेट संपवून सर्वजण केम्ब्रिजला पोहोचतात. ऑक्सफर्ड ते केंब्रिज हा प्रवास साधारणपणे ४ तासाचा आहे. दुपारी निघून संध्याकाळपर्यंत विद्यार्थी केंब्रिजला पोहोचतात. तो दिवस स्थिरस्थावर होण्यात जातो. दुसऱ्या दिवशी सकाळपासून केम्ब्रिज बघायला सुरुवात होते. केम्ब्रिज शहर, त्यातील संग्रहालये, ग्रंथालये, कॉलेज परिसर आणि इतर प्रेक्षणीय स्थळे याची सर्वसाधारण कल्पना येण्यासाठी पहिल्या दिवशी केम्ब्रिज टूर (Cambridge Tour) ची बस घेतली जाते. या बसमधून प्रवास करताना आलेला अनुभव आणि शहरातील पाहिलेली ठिकाणे यांची माहिती या लेखात देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आमची राहण्याची व्यवस्था केंब्रिजच्या युथ होस्टेलमध्ये करण्यात आली होती. हे ठिकाण केंब्रिज रेल्वे स्थानकाच्या अगदी जवळ आहे. केंब्रिज टूरची बस रेल्वे स्थानकापासून निघते. म्हणून आम्ही चालत चालत रेल्वे स्थानकावर पोहोचलो. तेथे असलेल्या बूथमधून दिवसभराच्या प्रवासाचे तिकिट घेतले. ''हे तिकिट केंब्रिज टूरच्या कोणत्याही बसला चालते. तुम्हांला वाटेल तिथे तुम्ही उतरू शकता आणि मागून येणाऱ्या बसने पुढचा प्रवास करू शकता. साधारणपणे अर्ध्या अर्ध्या तासाने स्टेशनवरून बस सुटते.'' एवढी माहिती तिकिट देणाऱ्या व्यक्तीने आम्हांला दिली. आजूबाजूचे निरीक्षण करीत आम्ही बस येण्याची वाट पाहू लागलो. आम्हांला जास्त वेळ ताटकळत बसावे लागले नाही. थोड्याच वेळात ''बस आली, बस आली'' असा गलका विद्यार्थ्यांनी केला. ही बस ओळखायला फार सोपी आहे. लाल रंगाने रंगविलेल्या या बसवर (Cambridge Tour) असे ठळकपणे लिहिलेले असते.



केम्ब्रिज टूर बस

बस दुमजली असून वरचा मजला उघडाच ठेवलेला असतो. या मजल्याला छत नसले तरी तिथे बसायला खुर्च्या मात्र असतात. बसचे दरवाजे उघडताच आम्ही पुढच्या दाराने प्रवेश केला. आमच्या जवळची तिकिटे आम्ही चालकाला दाखविली. त्याने मानेनेच आत बसा असे खुणावले. थोडा वेळ खाली बसायचे की वर बसायचे यावर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा झाली. सरतेशेवटी टपावर बसून आपण केंब्रिज पाहू या असे ठरले. त्यानुसार आम्ही टपावर जाऊन

आपल्याला आवडेल अशी जागा पाहून बसलो. सहलीचा मार्ग दाखविणारे नकाशे तेथे ठेवलेले होते. एकेक प्रत प्रत्येकाने घेतली आणि त्याचे निरीक्षण करू लागले. बसमध्ये फारशी गर्दी नव्हती. आमच्या गटाखेरीज आणखी दोन-तीन गट होते. प्रत्येकजण आपापले कॅमेरे सरसावून बसले होते. कॅमेरे तरी किती प्रकारचे? सध्या डिजिटल कॅमेऱ्याने क्रांतीच केलेली आहे. मोबाईल फोनसारखे अतिशय पातळ असे काही कॅमेरे होते. काहींच्या हातात जरा मोठ्या आकाराचे कॅमेरे होते. परंतु हातात कॅमेरा नाही अशी एकही व्यक्ती बसमध्ये नव्हती. कोडॅक या कॅमेरा तंत्रज्ञाचे मी मनातून आभार मानले. कॅमेरा ही जेव्हा दुर्मीळ वस्तू होती तेव्हा सर्वसामान्य व्यक्तीला परवडेल असा कॅमेरा बनविण्याचे स्वप्न त्याने पाहिले. अर्थात त्याने बनविलेले कॅमेरे जुन्या पद्धतीचे होते. त्याच्या कारकिर्दीत त्याचे स्वप्न काही अंशी पूर्ण झाले. आज ते खऱ्या अर्थाने पूर्ण झाले असे म्हणता येईल.

चालकाने बस सुरू केली. त्याबरोबर बसच्या गाईडने आमचे स्वागत केले. बसमध्ये जागोजागी लावलेल्या लाऊडस्पीकर मधून जेव्हा आवाज आला, तेव्हा आम्ही गाईड कुठे आहे ते शोधू लागलो. वरच्या मजल्यावर तर तो नव्हता. बहुधा खाली असावा म्हणून एक विद्यार्थी खालच्या मजल्यावर जाऊन आला. तेथेही तो नव्हता. चालक बोलतो आहे का हे पाहण्याचा प्रयत्न केला. तो तर बोलत नव्हता. नंतर लक्षात आले ही टेप केलेली अनाऊन्समेंट होती. केवळ अनाऊन्समेंट नाही तर संपूर्ण प्रवासाचे वर्णन असे टेप करून ठेवलेले आहे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचायला किती वेळ लागतो, मध्ये सिग्नलपाशी किती वेळ थांबावे लागते या सर्व बाबींचा विचार करून प्रवासवर्णन ध्वनीमुद्रित करून ठेवलेले आहे. तेथे उपस्थित नसलेल्या गाईडच्या स्वागताने आमच्या सहलीला सुरुवात झाली. रेल्वे स्थानकावरून निघालेली आमची बस चौकापर्यंत येऊन डाव्या बाजूला वळू लागली. तेवढ्यात गाईडने आम्हांला पुढे बघायला सांगितले. बघतो तर सर्वत्र झाडेच झाडे. हा केंब्रिजच्या बोटॅनिकल गार्डनचा परिसर असल्याचे त्याने सांगितले. कोणाला उतरायचे असेल उतरू शकता, अशी सूचना ही गाईडने केली. परंतु ऑक्सफर्ड बोटॅनिकल गार्डन आम्ही पाहिले असल्याने केंब्रिजचे गार्डन पाहायचे नाही असे आम्ही ठरविले होते. म्हणून आम्ही बसमध्येच बसून राहिलो. बस पुढे जात राहिली. गाईडचे मार्गदर्शन सुरूच होते. केंब्रिज शहराबद्दल तो माहिती देत होता. थोड्याच वेळानंतर आणखी एक थांबा आला. हा थांबा फिट्झ विल्यम संग्रहालयाचा असल्याचे जेव्हा आम्हांला कळले तेव्हा तेथे उतरायचे ठरविले. आमच्या बसमधील बहुतेक सर्वजण या थांब्यावर उतरले. तिथे बसची वाट पाहणारे प्रवासी बसमध्ये चढले आणि आमची बस निघून गेली. फिट्झ विल्यम संग्रहालय आकाराने विस्तीर्ण आहे. येथे धातू, काच, चिनीमातीच्या अनेक सुंदर सुंदर वस्तू ठेवलेल्या आहेत. तळमजला संपूर्ण धातूच्या वस्तूंसाठी, वरचा मजला चिनीमातीच्या वस्तूंसाठी आणि सर्वात वरचा मजला रंगीत चित्रांसाठी वापरला आहे. साधारणपणे तासभर संग्रहालयात फिरून आम्ही बसस्टॉपवर परत आलो. फिट्झ विल्यम भेटीवर एक स्वतंत्र लेख लिहिण्याचा विचार आहे.



संग्रहालयाच्या समोर घेतलेले छायाचित्र

बसस्टॉपवर आम्हांला फार वेळ थांबावे लागले नाही. थोड्याच वेळात केंब्रिज टूरची दुसरी बस आली. परत त्या बसच्या वरच्या मजल्यावर आम्ही जाऊन बसलो आणि आमची सहल पुनश्च सुरू झाली. बस आता जुन्या वस्तीतून जाऊ लागली. दोन्ही बाजूला दगडाने बांधलेल्या जुन्या इमारती होत्या. ह्या इमारतींमध्ये केंब्रिज विद्यापीठाची कॉलेजेस् आहेत असे गाईडने सांगितले. अशा अनेक कॉलेजचे मिळून केंब्रिज विद्यापीठ तयार झाले आहे. सेंट जॉन्स कॉलेज, क्वीन्स कॉलेज अशी अनेक कॉलेजेस मागे टाकत बस प्रसिद्ध केंब्रिज पुलावर आली. या पुलावर बस थांबताच आम्ही सर्वजण खाली उतरलो. आजूबाजूचा परिसर पर्यटकांनी गजबजून गेला होता. कॅम या नदीवर बांधलेला हा पूल आहे. खरे तर कॅम नदीवर बांधलेला ब्रिज या अर्थाने गावाला केंब्रिज असे नाव पडले आहे. केंब्रिज नदीतून अनेक बोटी जात असलेल्या आपल्याला दिसतात. याला पंटींग असे म्हणतात. अनेक पर्यटक शुल्क देऊन नदीतून बोटीने फेरफटका मारून येतात. या पुलाच्या शेजारीच एक लाकडी पूल आहे. त्याला भौमितीय पूल (Geomatical Bridge) असे म्हणतात. पुलावरील दृश्य पाहून झाल्यावर आम्ही परत बस स्टॉपवर आलो आणि मागच्या बसची वाट पाहू लागलो.




नदीवरील भौमितीय पूल

लवकरच बस आली आणि आमची पुढची सहल सुरू झाली. गाईडने लगेच सांगितले की बसच्या पुढे असलेले कॉलेज डार्वीन कॉलेज असून उजवीकडच्या कॉलेजचे नाव क्वीन्स कॉलेज असे आहे. काही मीटर पुढे गेल्यावर बस उजवीकडे वळली. बस वळताच गाईडने आम्हांला आपले कॅमेरे तयार ठेवायला सांगितले. आमचे प्रत्येकाचे कॅमेरे तयार होतेच. तरीही एका महत्वाच्या ठिकाणाचे दर्शन होणार आहे यासाठी कॅमेरे तयार ठेवा असे गाईडला सुचवायचे होते. बस उजवीकडे वळून कॅम नदीला समांतर जाऊ लागली. नदी आणि रस्ता यांमधील जागा मोकळी असून त्यावर चांगलेच गवत वाढविले होते. गवताच्या भोवताली मोठमोठाली झाडे आहेत. आमची सहल मे महिन्यात होती. त्यामुळे सर्व झाडांना नवीन पालवी आलेली होती. जवळ गवताळ पटांगण, त्यापुढे नदी आणि दूरवर कॉलेजच्या इमारती असे दृश्य पाहात आम्ही पुढे चाललो होतो. तेवढ्यात एकदम गलका झाला. एक अतिशय सुंदर दृश्य आमच्या नजरेस पडले. दोन झाडांच्यामधून दिसणारे भव्य चर्च असे ते दृश्य होते. हे किंग्ज कॉलेजचे चर्च असल्याचे गाईडने आम्हांला सांगितले. आम्ही सर्वांनीच पटापट फोटो काढले. बस पुढे जात राहिली. थोड्याच वेळानंतर केंब्रिज विद्यापीठ ग्रंथालयाचा थांबा आला. या थांब्यावर आम्ही बसमधून उतरलो.



किंग्ज कॉलेज, चॅपेल

ऑक्सफर्ड प्रमाणेच केंब्रिजमध्ये अनेक कॉलेजेस आहेत. या कॉलेजांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंब्रिज विद्यापीठाची स्थापना करण्यात आलेली आहे. प्रत्येक कॉलेजचे स्वत:चे ग्रंथालय आहेच, त्याचबरोबर विद्यापीठाचे एक प्रशस्त ग्रंथालय आहे. बस स्टॉपवर उतरून आम्ही ग्रंथालयाकडे चालत गेलो. ग्रंथालयाची इमारत खूप मोठी आहे. विटांनी बांधलेली ही इमारत सुंदर दिसते. प्रवेशद्वारावर असलेल्या अधिकाऱ्याची परवानगी घेऊन आम्ही आत प्रवेश केला. तेथल्या व्यक्तीने आम्हांला ग्रंथालयाबद्दल माहिती दिली. हे ग्रंथालय अनेक मजल्यांवर पसरले असून त्यात पुस्तकांचा मोठा संग्रह आहे. विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कॉलेजमधील कोणीही विद्यार्थी आणि शिक्षक या ग्रंथालयात येऊ शकतो.



विद्यापीठाचे ग्रंथालय

बाहेरच्या विद्यापीठातील विद्यार्थी आणि शिक्षक - देखील येथे येऊ शकतात. त्यासाठी विद्यापीठाकडून तसे पत्र त्यांना आणावे लागते. आमच्याकडे वेळ मर्यादित असल्याने आम्हांला ग्रंथालयात जाता आले नाही. परंतु आम्ही तिथे लावलेले एक प्रदर्शन पाहायचे ठरविले. हे प्रदर्शन इटलीमधील एका लेखकाबद्दल होते. त्यात त्या लेखकाची काही हस्तलिखिते ठेवलेली होती. त्याचबरोबर त्याच्या काही प्रसिद्ध पुस्तकांची इंग्रजी भाषांतरे ठेवलेली होती. हे प्रदर्शन पाहून काही वेळातच आम्ही बाहेर पडलो आणि बस स्टॉपवर बसची वाट पाहू लागलो.

कॅम नदीच्या किनाऱ्याने काही अंतर जाऊन बस डावीकडे वळली. हा तर गावाबाहेर जाणारा रस्ता. या रस्त्याने आपण कुठे चाललो? असा प्रश्न आम्हांला पडला. आमच्या प्रश्नाचे लगेच उत्तर आम्हाला मिळाले. आम्ही अमेरिकन स्मशानभूमीकडे चाललो होतो. ही स्मशानभूमी गावापासून बरीच दूर आहे. तेथे जायला बराच वेळ लागतो. त्याआधी कॅव्हेंडिश प्रयोगशाळा आपल्या नजरेला पडते. त्यानंतर बस एका बागेकडे वळते. तेथे फळाफुलांची अनेक झाडे आहेत. काही लोक तेथे उतरले. आम्ही मात्र बसमध्येच बसून राहिलो. बस जेव्हा अमेरिकन स्मशानभूमीजवळ पोहोचली तेव्हा मात्र आम्ही खाली उतरलो. दुसऱ्या महायुद्धात बरेच अमेरिकन सैन्य कामी आले. त्यांचे मृतदेह अमेरिकेला परत नेण्याऐवजी केंब्रिजला त्यांना पुरण्यात आले. त्यासाठी इंग्रज सरकारने केंब्रिज शहराजवळची जागा उपलब्ध करून दिली. स्मशानभूमीचा परिसर अतिशय स्वच्छ आणि सुंदर ठेवलेला आहे. स्मशानभूमीच्या एका टोकाला अमेरिकेचा ध्वज तर दुसऱ्या टोकाला चर्च आहे. स्मशानभूमीच्या रस्त्याकडच्या बाजूला एक भिंत आहे. या भिंतीवर दुसऱ्या युद्धात कामी आलेल्या सर्व सैनिकांची नावे आहेत. दुसऱ्या बाजूला त्यांची प्रेते पुरलेली असून प्रेताची जागा दाखविण्यासाठी पांढऱ्या रंगाचा खांब जमिनीत रोवलेला आहे. लांबून हे सर्व खांब सुंदर आकृती तयार करतात असे भासते. अमेरिकन स्मशानभूमीच्या भेटीवर वेगळा स्वतंत्र लेख लिहिण्याचा विचार आहे.



अमेरिकन स्मशानभूमी

केम्ब्रिज टूरची बस येते आहे असे दिसले म्हणून आम्ही स्मशानभूमीच्या बाहेर पडलो. त्यानंतर आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. ज्या वाटेने आम्ही गावाच्या बाहेर गेलो त्याच वाटेने आम्ही परत आलो. परंतु नदीला समांतर असलेल्या रस्त्याला जेव्हा लागलो तेव्हा बस डावीकडे वळली. त्याबरोबर पुढचा स्टॉप मानव संग्रहालय असल्याचे आमच्या गाईडने सांगितले. या संग्रहालयाला उतरायचे असे आम्ही ठरविले. या संग्रहालयात प्राचीन काळापासून आतापर्यंत माणसाने बनविलेल्या आणि वापरलेल्या वस्तू ठेवलेल्या आहेत. त्यांत जुन्या खुर्च्यांपासून तर टाईपरायटरपर्यंत सगळ्या वस्तूंचा समावेश आहे. दोन मजल्यावर पसरलेले हे संग्रहालय पाहायला आम्हांला साधारणपणे एका तासाचा अवधी लागला. आम्ही संग्रहालयाच्या बाहेर पडलो तेव्हा संध्याकाळ व्हायला आली. सात वाजण्याच्या आधी आम्हांला यूथ होस्टेलमध्ये पोहचायचे होते. कारण आमचे रात्रीचे जेवण ते साडे सात वाजता देणार होते. म्हणून सहल आटोपती घेण्याचे आम्ही ठरविले. मागून आलेली बस आम्ही घेतली. ही बस जुन्या चर्चकडून रेल्वे स्टेशनकडे गेली. इथूनच तर आम्ही सहलीला सुरुवात केली होती. तेथेच आम्ही सहलीचा शेवट केला. आमच्या चेहऱ्यावर थकवा होता; पण खूप काही पाहिल्याचे समाधानदेखील होते.



शहराचा बाह्य परिसर

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे आपल्या अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे. शिवाय वाचन लेखन या परस्परावलंबी प्रक्रिया असल्याने त्यांच्यामुळेच आपण समृद्ध बनू शकतो.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित आहे**

**- संपादक**

# उल्लेख निर्देश: अर्थ व संकल्पना

*उल्लेख निर्देश असणे हे संशोधनपर साहित्यातील महत्त्वाचे अंग. त्यामुळे संशोधन विषय परंपरेत शोधता येतो तसाच त्याचा भविष्यकालीन वेधही घेता येतो. संशोधन ग्रंथालयातील ग्रंथपालाने विशेष लक्ष द्यावे असे हे क्षेत्र आहे. – संपादक*

## प्रास्तावना :

विचारांची देवाणघेवाण मानवी संस्कृतीच्या पुरातन काळातही होत असे. वेली व पानांनी झाकलेल्या खड्ड्यात गफलतीने पडून बाहेर आलेल्या माणसाने दुसऱ्यास तिथून जायला अटकाव करून, दुसऱ्या मार्गाने जाण्याचा निर्देश केला असेल. हावभाव व हातवाऱ्यांच्या साहाय्याने माहितीच्या संप्रेषणासाठी केलेला हा कदाचित पहिलाच निर्देश असेल. पुढे प्रगतीच्या ओघात ज्ञानप्रसाराची मौखिक परंपरा सुरू झाली. लिपीचा, लिहिण्याचा शोध लागल्यावर हेच कार्य लिखित स्वरूपात होऊ लागले.

## निर्देश :

निर्देश म्हणजे दिशादर्शन. निर्देशाला इंग्रजीत Index असे म्हणतात. याची व्युत्पत्ती लॅटिन भाषेतील Indicare या शब्दापासून झाली आहे. Indicare याचा अर्थ कशाकडे तरी निर्देश करणे, काहीतरी दाखवणे असा आहे. हॅरॉल्ड बोरको आणि चार्लस् बनियर यांच्या मते ग्रंथ, ग्रंथातील प्रकरणे, नियतकालिकांतील लेख इत्यादींकडे दिशादर्शन करणारे साधन म्हणजे निर्देश होय. निर्देश हा हव्या असणाऱ्या माहितीकडे दिशा दर्शवणारा दर्शक किंवा सूचक आहे असे मत हेन्री बेंजामिन व्हिटले मांडतात. ए. आर चक्रबोर्ती व भुवनेश्वर चक्रबोर्ती यांच्या मते निर्देश हा माहितीचा स्रोत व माहितीचा उपभोक्ता यांच्यामधील संवादात्मक दुवा आहे. म्हणजेच, जेथे ज्ञानाची, माहितीची प्रतिप्राप्ती होऊ शकते, तेथे जाण्याचा दाखवलेला मार्ग म्हणजे निर्देश होय.

## निर्देशन :

निर्देशन म्हणजे निर्देश करण्याची प्रक्रिया. साल्टन यांनी म्हटल्याप्रमाणे 'प्रलेखाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सूचीय नोंदी तयार करून, त्या नोंदींची शिस्तबद्ध पद्धतीने रचना करण्याची प्रक्रिया, म्हणजे निर्देशन होय' ए. आर. चक्रबोर्ती व भुवनेश्वर चक्रबोर्ती यांनी निर्देशनाचे स्वरूप अगदी स्पष्ट मांडले आहे. ते म्हणतात, निर्देशन ही एक कला, तसेच एक शास्त्र आहे. कला असल्याने ते भान किंवा संवेदना व कसोटी यांच्या वापराची आशा बाळगते आणि शास्त्र असल्याने ते नियम व पद्धती यांच्या वापराला प्रोत्साहन देते.

## उल्लेख :

लेखक प्रलेखातून आपले विचार मांडत असतो. त्या विचारांच्या समर्थनार्थ तो पूर्वसूरींच्या विधानांचा आधार घेत असतो. तो आधार नेमका कुठला, कुठून प्राप्त झाला, याचा पुरावा देत असतो. शास्त्रीय परिभाषेत यालाच उल्लेख असे म्हणतात; म्हणजेच, विशिष्ट विषयाशी संबंधित याआधी इतर लेखकांनी मांडलेल्या विचारांचा पुरावा म्हणजे उल्लेख होय. या उल्लेखांनाच तळटीपा (Footnotes), उल्लेखित प्रलेख (Cited Documents) किंवा संदर्भ (Refernce) असेही म्हणतात.

## उल्लेखाची कारणे

उल्लेख किंवा तळटीपा यांच्या प्रयोजनाची काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

- दुसऱ्याचे मत स्वत:चे म्हणून मांडणे गैर आहे. त्यामुळे वाङ्मयचौर्याचा आरोप होऊ शकतो.
- ऋणनिर्देश करण्याची पूर्वसूरींनी घालून दिलेली परंपरा पुढे चालवायची असते.
- स्वत:शी प्रामाणिक राहणे.
- प्रलेखातील विधानांची अधिकृतता आणि साधनांची विश्वसनीयता याची पारख वाचकाला करता येणे.
- भावी अभ्यासकाला मार्गदर्शन घडावे.
- आपल्या प्रतिपाद्य विषयाशी कमी संबंधित असलेला, पण अन्य दृष्टीने उपयुक्त असा संदर्भ नोंदवून ठेवल्यास इतर अभ्यासकांच्या विचारांना चालना मिळते.
- एखाद्या साधनाचा शोध घेऊनही ते न मिळाल्यास त्या साधनासाठी आपण जेथवर मार्ग काढत गेलो, त्याचा उल्लेख केला जातो. भावी अभ्यासकाला ते उपलब्ध होण्याची शक्यता असते.
- विवेचनाच्या ओघात अडथळा आणणारे अवांतर शेरे तळटीपेत नोंदवल्याने लेखनाचा मुद्देसूदपणा ढळत नाही.
- तांत्रिक माहिती किंवा दुर्मीळ हस्तलिखितांची माहिती उल्लेखाद्वारे द्यावी.
- ग्रंथांतर्गत प्रतिसंदर्भ (Cross References) देण्यासाठी उल्लेख द्यावा.
- दोन किंवा तीन कलमांत मेळ घालण्यासाठी उल्लेख करावेत.
- संशोधनाचा किंवा विकासाचा प्रवाह (Trend) कळावा.
- घटना किंवा तिथी इत्यादींचा पुरावा असावा.

### उल्लेखाच्या पद्धती

उल्लेख करण्याच्या पुढीलप्रमाणे अनेक पद्धती सांगता येतात.

- प्रत्यक्ष अवतरण उद्धृत करणे.
- प्रत्यक्ष आकृती, कोष्टक वा तक्ता तसाच देणे.
- लेखकाचा मथितार्थ आपल्या शब्दांत देणे.
- एखाद्या आकृतीवरून स्वत:ची वेगळी आकृती तयार करणे.
- एखाद्या मताचा स्वत: अनुवाद करणे.
- सर्वसामान्य वाचकाला माहीत नसेल असा पुरावा देणे.

### उल्लेख निर्देश :

मध्या माहितीचा विस्फोट झाला आहे. प्रचंड प्रमाणात निर्माण होत आहे. ती विविध प्रकारच्या प्रलेखांमधून विखुरलेली असून त्यात माहितीचे आधार उल्लेखलेले आहेत. या दृष्टीने या माहितीला एक मूल्य प्राप्त झाले आहे. उल्लेखांच्या विशिष्ट दर्जामुळे माहितीचे मूल्य कमीजास्त होत असते. या उल्लेखांची वाचकांना व अभ्यासकांना वारंवार गरज पडत असते. हे काम त्वरित व अचूक व्हावे, या गरजेतूनच उल्लेख निर्देशाचा जन्म झाला.

युजिन गारफिल्ड यांनी उल्लेख निर्देशाचे महत्त्व विशद करताना असे सांगितले आहे की संशोधक आपल्या विषयातील संपूर्ण ऐतिहासिक प्रगतीसाठी उल्लेख निर्देशाच्या केवळ एकाच आवृत्तीद्वारे हेतू साध्य करू शकतो, ज्यासाठी पद्धती संशोधनात त्या विषयाच्या अनेक निर्देश आवृत्त्यांची मदत घ्यावी लागली असती.

### उल्लेख निर्देशाचे उपयोग:

उल्लेख निर्देशाचे उपयोग पुढीलप्रमाणे आहेत.

- यात एका प्रलेखाशी संबंधित, पर्यायाने एकाच

विषयाशी निगडित असे उल्लेख असतात. त्यातून अनायसेच त्या विषयावरील सूची तयार मिळते.

- विशिष्ट प्रकारच्या प्रलेखांमध्ये ज्या नियतकालिकांचा जास्तीत जास्त उल्लेख केला जातो, त्यांना प्रमुख नियतकालिके (Core Journals) असे म्हणतात. अशा कोणत्या प्रमुख नियतकालिकांचा किती वापर होतो, हे ठरवून त्याची श्रेणीबद्ध यादी तयार करण्यासाठी उल्लेख निर्देश उपयुक्त ठरतात.
- उपभोक्ते, ग्रंथ, नियतकालिके, प्रबंध, अहवाल, वेबसाईट वगैरे कोणत्या प्रकारचे प्रलेख प्राधान्याने वाचतात, ते कळते.
- एखाद्या विषयाचा उगम व विकास कसा झाला हे कळते. उदा. एखाद्या प्रलेखात दुसऱ्या एकाही प्रलेखांचा उल्लेख नसल्यास तो प्रलेख त्या विषयावरील पहिलाच प्रलेख असू शकतो हे समजते.
- विशिष्ट प्रलेखाचा उल्लेख करणाऱ्या प्रलेखांची संख्या कमी कमी होत असेल, तर तो त्या विषयातील तज्ज्ञ असल्याचे लक्षात येते.
- लेखकांना आपल्या लिखाणावरील प्रतिक्रिया समजतात.
- प्रलेखांच्या आशय विश्लेषणाची गरज नसते. कारण उल्लेख निर्देशातील नोंदी लेखकाच्या नावानुसार असतात.
- शोध शीर्षक तयार करण्याची गरज नसते. नुसते लेखकाचे नाव माहीत असले तरी पुरते.
- देश, भाषा यांनुसार प्रकाशित प्रलेखांचे प्रमाण ठरवता येते.
- विषयानुसार नोंदी होत असल्याने संज्ञा नियंत्रणाची गरज नसते.
- उल्लेख करणाऱ्या प्रलेखांमध्ये त्या प्रलेखाच्या लेखकाला उपयुक्त ठरलेले प्रलेख असतात. हे प्रलेख कोणत्याही ज्ञानशाखेतील असू शकतात. यावरून एका ज्ञानशाखेचा दुसऱ्या कोणत्या ज्ञानशाखेशी संबंध आला आहे, ते कळते.

**त्रुटी :**

उल्लेख निर्देश वरीलप्रमाणे जरी उपयुक्त असले तरी त्यात काही दोष किंवा त्रुटी आढळतात. या त्रुटी अशा आहेत.

- उल्लेख निर्देशातील नोंदी लेखकाच्या नावानुसार अनुवर्ण पद्धतीने लावलेल्या असतात. त्यामुळे संबंधित विषयावरील नोंदी विखुरल्या जातात.
- आपल्या प्रलेखात इतर प्रलेखांचा उल्लेख करायचा की नाही, किती वेळा करायचा, या सर्व बाबी सर्वस्वी लेखकाच्या मर्जीवर अवलंबून असतात. त्यामुळे अशा व्यक्तिनिष्ठ उल्लेखांचे निर्देश वस्तुनिष्ठ होतीलच, असे नाही.

**सारांश :**

उपभोक्त्याच्या गरजेच्या विषयातील सखोल माहितीसाठी उल्लेख निर्देश उपयुक्त ठरतात. उल्लेख करण्याची पद्धती फार जुनी आहे. काळानुसार तीत अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. उदा. पूर्वी उल्लेखांना Scholia म्हणत. Scholia म्हणजे विद्वत्ता. पूर्वी आपल्या प्रलेखात इतर प्रलेखांचा उल्लेख करणे हे विद्वत्तेचे लक्षण समजले जाई.

तेच आता अलीकडील आपल्या ग्रंथात सी. आर. कोठारी यांनी असे मत मांडले आहे की, 'It should always be kept in view in view that citation is not an end nor a means of the display of scholarship. The modern tendency is to make the minimum use of citation, for scholarship does not to be displayed'

असे असले तरी उल्लेखांचा उपयोग व महत्त्व याला बाधा आलेली नाही. अगदी एखादा ग्रंथ रद्दबातल न करण्यासाठी एखादी तळटीप किंवा एखादा उल्लेखही कारणीभूत होऊ शकतो. डॉ. प्रदीप कर्णिक म्हणतात, 'गाळलेल्या भागासाठी, प्रस्तावनेसाठी, फोटो वा तळटीपेसाठीही जुनी आवृत्ती जपायला हवी.' यावरून उल्लेख निर्देशाचे महत्त्व लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथसूची :**


- Chakraborty, A.R. and Chakraborty, Bhubaneshwar, Indexing: Principles, Processes and Products.
- Garfield, Eugine, Citation Indexing: It's theory and application in Science, Technology and Humanities, Philadelphia: ISI, 1983
- Kothary, C.R., Research Methodology: Methods and Techniques: 1990, Ed.2
- कर्णिक, प्रदीप, ग्रंथ रद्दबातल धोरण, ज्ञान गंगोत्री, सप्टें - नोव्हें २००३, वर्ष ४, अंक २, नाशिक य.च.म.मुक्त विद्यापीठ, २००३
- मालशे, स. गं., शोधनिबंधाची लेखनपद्धती, पुणे सुविचार, १९७५



**प्रा. श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये**

बी/३, जय मंगलस्मृती सोसायटी, संत नामदेव पथ, गल्ली क्र. २, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,

दूरध्वनी क्र. (०२५१) २४४१७५२

भ्रमणध्वनी- ९२२३३७४३००

smathalye42@gmail.com


●●●

## वणव्यांचा अभ्यास

राजस्थान हे भारतातले मोठे राज्य असून या भागात वारंवार लागणाऱ्या वणव्यांचा विषय महत्त्वाचा आहे. करंट सायन्सचा मे २०१२ च्या अंकात आलेला एक माहितीपूर्ण लेख लक्ष वेधून घेणारा आहे. टाइम सिरीज ॲनालिसिस वर आधारित दूरसंवेदनाच्या साह्याने जंगलामधील जळलेल्या वन क्षेत्राचा हा अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी IRS P6 Awifs या उपग्रहाच्या मदतीने २००५ ते २०१० मधील मार्च एप्रिल व मे महिन्यांचा अभ्यास करण्यात आला त्यातून असे दिसून आले की, ५३,०२३.५ हेक्टर (२००५), ४४६८१.०५ (२००६), ५७६८९ हेक्टर (२००७), ८९६५५.२ हेक्टर (२००८), १९९८३७ हेक्टर (२००९) व १४४८१६ हेक्टर (२०१०) इतके वनक्षेत्र आगीत जळून गेले. अरवली पर्वताच्या दक्षिण भागांतच हे वणवे आढळले. या संदर्भात तपशीलवार लेख लिहिताना नॅशनल रिमोट सेन्सिंगच्या जंगलशास्त्र व परिस्थितीकी विभागातील शास्त्रज्ञ पी. हरी कृष्णा व सी सुधाकर रेड्डी यांनी राजस्थानमधील वणव्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता दूरगामी योजना हाती घेण्याची गरज पटवून दिली आहे. जैवविविधता व जैव संसाधनांसाठी याचे व्यवस्थापन अत्यंत गरजेचे आहे.

संदर्भ - Assessments of Increasing threat of forest fire in Rajasthan, India using multi temporal remote sesing data (2005-2010) - पी. हरी कृष्ण व सी. सुधाकर रेड्डी, करंट सायन्स, खंड १०२, अंक क्र. ९, १० मे २०१२ पृ. १२८८

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

(उत्तरार्ध)

*मागील लेखाच्या या उत्तरार्धात श्री. साने प्रामुख्याने गणेश विद्या, उर्ध्वरेत गणपती यांचा विचार मांडत आहेत*

*- संपादक*

(जून २०१२ च्या अंकावरुन पुढे चालू)

"देवतेचे ज्ञान नसताना तुम्ही जर यज्ञात सामगान केले तर तुमची मस्तके विछिन्न होतील" असे 'उपस्तिनी' सांगितले.

देवता ध्यानाला मुख्य आधार म्हणजे मानवी शरीरातील सुप्तावस्थेत, निद्रित अवस्थेत असणारी परमात्मशक्ती, प्राणशक्ती, जागृत (क्रियाशील) करुन त्या आधाराने देवतातत्वावर साक्षीभावाने ध्यान करणे होय. "यथा पिण्डे तथा ब्रम्हांडे" या न्यायाने ही क्रिया घडत असते."

**मुळाक्षराच्या पुढचा प्रवास :**

हे सर्व जाणल्यावर लक्षात येईल कीं प्रचलित समाजात ज्या संकल्पना, रूढी देवता शक्तीचा लाभ मिळवण्यासाठी होतो आहे, तो पसरट आहे किंवा पूर्ण ज्ञानी नाही. म्हणूनच ती मुळाक्षरे आहेत का? मुळाक्षरांची वाक्ये, गद्य, पद्य, स्तोत्रे, भजने, कथा, ललीत वर्णने अशा प्रवासात मंत्रशक्ती व प्रत्यक्ष अनुभूती व प्रसाद असा प्रवास व्हायाला हवा ना. तो उत्तराताई या पुस्तकात कसा करतात ते संक्षेपाने जरुर पाहू या.

उत्तराताईच्या पुस्तकाला काही प्रस्तावना लाभल्या आहेत. डॉ. द. भि. कुलकर्णी यांना हे पुस्तक, "अद्भूत संवेदनाक्षमता, सखोल चिंतनशीलता, सकस काव्यात्मकता, वाङमयीन वाटते" हे खरेच आहे.

पण पुढे ते म्हणतात 'अध्यात्मशास्त्राचे अनोखे दर्शन या ललित गद्यात घडते - मराठी ललित गद्याचा हा अनवट नजराणाच आहे. हे आत्मपर आध्यात्मिक लेखन वाचकाला स्तिमीत आणि अंतर्मुख करते; त्याचे आत्मभान संपन्न करीत करीत त्याला वाङमयीन परतत्वाच्या परिस्पर्शाची अनुभूती येते.'

हे 'अलंकृत' 'ललित' वर्णन योग्यच आहे. पण, ह्या भाष्यातील 'आत्मपर', 'अंतर्मुख', 'आत्मभान' ह्या शब्दांना जे शास्त्रीय अर्थ व सत्यार्थ आहेत. ते जाणणे व होणे महत्वाचे आहे.

ह्या प्रवासात समाज पुष्कळसा मागेच गेला आहे व त्याचे सत्य अध्यात्मशास्त्र, स्पिरीच्युअॅलिटी, योगशास्त्र, उपासना शास्त्र, साधनाशास्त्र, तंत्र साधना, यंत्र, मंत्रशास्त्र यांच्या खऱ्या स्वरूपांकडे पुष्कळ दुर्लक्ष व अज्ञान मिश्रित आहे. ते रसभरित वर्णनाने, वैभवी व श्रीमंती मूर्तीपूजेने अलंकारिक स्तोत्रे, दीर्घ शुष्क जपाने, दीर्घ पारंपारिक धार्मिक व्रतवैकल्याने खऱ्या अर्थाने प्राप्त होणार नाही. सगुण शास्त्रावरील पूजा प्रकाराने भावनिक अनुकूलता जरूर येईल, पण 'मूर्ताकडून अमूर्ताकडे' जाण्याचा किंवा व्यक्त जगातील दर्शनाकडून अव्यक्त जगातील अंतरंग अनुभूती शास्त्रीय दर्शनाकडे, प्रवास होणार नाही. ह्या दोन प्रकारातील दरी फार गूढ, खोल व अंधःकारमय आहे. ही दरी ओलांडण्यासाठी जी शक्तिसाधना आवश्यक व अटळ आहे, तिच्याकडे लक्ष वेधणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वरीचे पारायण करणारे वारकरी त्यांतील नाथ सांप्रदायिक, 'कुंडलिनी जागृती बद्दल' अनुत्सुक व उदासीन आहेत. ह्या शक्तिसाधनेचे अनेक मार्ग आहेत, पण ह्या शक्तीच्या जागृतीशिवाय व साधना व तपस्येशिवाय ह्या मुळाक्षरांना

जाणणारा, मानव आत्मभान व आत्मोद्धाराकडे प्रवास बिलकूल करणार नाही. त्याला त्या आभासात, मायेत गुंतवून ठेवण्याचेच काम सध्याचे कथित आध्यात्मिक रूपाचे धर्मज्ञान ललित गद्य, वा सगुण पूजा प्रयत्न करताहेत. त्यामुळे, खरी प्रगती होत नाही. ही परिस्थिती गौतम बुद्धाच्या वेदिक यज्ञसंस्थेशी फारकत घेतलेल्या काळापासून आजतागायत त्याच स्थितीत अंधारात आहे.

**Go Back to Vedas :**

त्यामुळे स्वामी दयानंद (आर्य समाज) व महायोगी अरविंद यांनी मूळ अपौरुषेय वेदज्ञानाकडे जे लक्ष वेधले ते अभ्यासणे, जाणणे व त्या मार्गावर जाणे जरूरीचे आहे. त्या जागृतीला तरणोपाय नाही.

आता, एक दोन उदाहरणे देऊनच हा मुद्दा स्पष्ट करतो. उत्तराताईंचा '**श्री गणेश देवता**' हा पान ३५ ते ५४ म्हणजे २० पानी लेख महत्त्वाचा आहे. जरूर वाचावा असा आहे. पण, त्या 'देवतेचा' कोणता अर्थ प्राप्त होतो? 'गणेशविद्या' ही प्राप्त होणे आवश्यक आहे. होय ना?

पण, ह्या देवतेचे स्वरुप हे 'लिपीशास्त्राचा जनक' (५२) ही देवता – गणेश महाभारतकाळी वेद व्यासाचा लेखनिक (५१) म्हणजे आजच्या काळातला 'स्टेनो टायपिस्ट' असे होत असेल, तर ते एका भौतिक शास्त्राची प्राप्ती एव्हढेच होईल. हे जरी खरे असले व ऐतिहासिक दृष्ट्या गौरवास्पद असले, तरी आध्यात्मिक नव्हे ह्या 'लिपी शास्त्राच्या निर्मितीची क्रिया ही 'सृष्टिक्रमाची' आहे उर्ध्वगामी म्हणजे 'ब्रह्मज्ञानाकडे' नेणारी नाही किंवा 'आत्मोद्धाराची' सुद्धा नाही ही 'सृष्टि 'संहाराची'(नाश नव्हे) कृती होणे आवश्यक आहे. ('संहार' ह्याचा अर्थ वेणीसंहार सारखा एकत्र करण्याचा आहे.)

**उर्ध्वरेत गणपती अफगाणिस्तान :**

डॉ. विजय बेडेकर, ठाणे व श्री विनय सहस्रबुद्धे हे अफगाणिस्तानला दौऱ्यावर गेले होते, तेथे त्यांना 'उर्ध्वरेत गणपतीचे' मंदिर आढळले. त्याचा फोटोही 'दिशा' ह्या मासिकाच्या माझ्या लेखात छापला आहे. हे सांगण्याचा उद्देश म्हणजे त्या काळीसुद्धा गणपती हा 'उर्ध्वरेत' साधना, जी कुंडलिनी शक्ती जागृतीची साधना आहे, त्या क्रियेचे एक स्थिर मूर्त स्वरुप दर्शवीत होता. जे संत ज्ञानेश्वर आपल्या ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात मराठी भाषेच्या लिखीत माध्यमाने करतात, का बरे?

कारण, भगवद्‌गीतेचा, लोकमान्य टिळक म्हणतात तो 'गीता रहस्याचा 'बोध' होणे, किंवा भगवान कृष्ण आपल्या १८ व्या अध्यायांच्या ज्ञान व योग मार्गाच्या उपदेशाने क्षत्रिय वर्णाच्या अर्जुनाला उद्देशून सांगतात, त्याचेही कारण 'आत्मबोध' व 'ब्रह्मज्ञान' हाच आहे. हा बोध सद्यकालातील सर्वसाधारण भौतिकवादी बुद्धीला होणे, आज अशक्य आहे व झाला आहे मग ह्या गणेश देवतेचे खरे स्वरुप व ज्ञान व दर्शन वा 'आवाहन' हे हवे असेल तर ही 'गणेशविद्या' ही काहीतरी निराळी असली पाहिजे. त्या क्रियेच्या शाब्दिक अर्थाच्या किंवा भौतिक 'प्रसादाच्या' 'लिपीशास्त्र' 'नृत्यशास्त्र' 'संगीतशास्त्र' ह्या शास्त्रांच्या प्राप्तिपेक्षा काहीतरी उच्चतर दुष्प्राप्य व उर्ध्वगतीचा अभ्यास असलाच पाहिजे. नाही का? तो विषय आहे योगिक आगमशास्त्राचा व त्यासाठी अंतरंगात घडणाऱ्या 'अनुभूती शास्त्राचा अभ्यास' ह्या अनुभूतीशास्त्राच्या क्रिया ह्या फक्त मन व प्राण ह्यांच्या सहाय्याने अंतरंगात व आत्म्याच्या ज्ञानकक्षा व क्षेत्रासाठी असल्याने त्या बाह्य, जड सृष्टीमध्ये सांगणे व स्पष्ट करणे दुरापास्त आहे. पण, वेदिक ज्ञानातील उपलब्ध वचनावरून ह्या क्रियांचे संपूर्ण ज्ञान त्या काळात मोठ्या प्रमाणात समष्टिमध्येही होते हे मानावयाला हरकत नाही. भरपूर पुरावे उपलब्ध आहेत.

**ही गणेशविद्या मी पुढील अंकात विशद करणार आहे.**

पण, महाप्रलय किंवा तत्सम नैसर्गिक उलथापालथीमुळे पृथ्वीवरील जीवनाला ह्या क्रियेचे जिवंत (Live) ज्ञान नाहीसे झाले. त्याचे फक्त शब्दज्ञान, वर्णने, पुराणे, तर्कपद्धती मानवी संस्कृतीने जपल्यामुळे आज त्याच्या पुसट खुणा काही तोकड्या व तुटक प्रमाणात हाती लागत आहेत. पण, ह्या भौतिकवादी, चंगळवादी मर्त्य मानवी जीवनाला त्याची जिज्ञासा व आस नाही. समाजाचे सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक नेतृत्व करणाऱ्या नेत्यांना व संस्थाना त्या ज्ञानाच्या पुनरुज्जीवित करण्याची आस व जरुरी वाटत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

हे काम आता निसर्ग व ईश्वर हे त्यांच्याच शक्तीने करील अशी आशा आहे. सज्जन नवीन व अनुकूल चितीयुक्त जीवात्म्यांना पृथ्वीवर पाठवून हा कार्यक्रम राबविला जाईल.

**मुख्य अडचण हेतू पुरस्सर केली :**

जैमिनींच्या पूर्व मीमांसेच्या संकर्षण कांड, व दैवतकाण्ड या नावाने चार अध्याय होते ते आज मिळत नाहीत. पूर्वमीमांसेला फक्त १-१२ कांडच होते असा दावाही करण्यात येतो आहे. तेव्हा, हेतूपुरस्सर हे झाले असावे असा दाट संशय आज प्राप्त होतो आहे. पण, त्याचा पूर्ण शोध घेणे मानव जातीच्या अत्यंत फायद्याचे आहे हे निश्चित.

आता अतिशय सूत्रोपद्धतीने व आदराने या पुस्तकातील संकल्पनावर, देवतातत्व, यज्ञ, अव्दैतवाद व वैष्णववाद (Vaishnavism), शक्तिसाधना, कर्मकांड, मूर्तिपूजा, Rituals धार्मिक रूढी व संस्कार ह्यावर विचार करु या.

मुख्य म्हणजे यज्ञसंस्था 'यज्ञ' संकल्पना हा मनावाचा शोध प्रयत्न नव्हे Human concept & Thought coustruct नव्हे तर विश्वनिर्मात्याने ज्या अद्वितीय निर्मिती यंत्रणेचा विचार केला व योजना आखली त्याचे कृती फळ आहे. जी तत्वे ह्या विश्वात रचलेली आहेत व कार्यरत आहेत ती सर्वसाधारण ज्ञानात आकाश, वायू, तेज, जल, पृथ्वी व नंतर शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध व नंतर मानवी 'पुरुष' ह्या रुपात श्रोत्र, त्वक, चक्षु, जिव्हा, प्राण व इतर काही तत्वाच्या युती संयोगाने 'पुरुष' ह्या रुपात (Form) मध्ये जड स्वरूप धारण करतात तो नासदीय सूक्तात वर्णन केलेल्या प्राथमिक अंधकार क्षेत्रातील पहिला 'यज्ञ' होय.

पण, ही क्रिया अव्यक्त होऊन नंतर व्यक्त जगात तिचे मूर्त वा व्यक्त फळ अनेक रूपात मिळाले. तो विश्वंभार पुरुषसूक्तात सांगितला आहे. त्या मूळ 'यज्ञ' संकल्पना व कृती ह्याचे छोटे व कमी सामर्थ्य असलेले जड स्वरूप हे आपल्याला माहीत असलेल्या 'यज्ञाचे स्वरूप पण, त्या यंत्राला जी साधने व वस्तू मिळतात वा लागतात त्या भौतिककातील, नाशिवंत वस्तू असल्याने, अर्थातच त्या यज्ञाचे सामर्थ्य अत्यंत मर्यादित आहे.

उत्तराताई म्हणतात (पृ. क्र. २१४) त्याप्रमाणे 'मानवी उर्जेला उर्ध्व गती देऊन मस्तकापर्यंत सहस्त्राचक्रापाशी नेण्याची प्रक्रिया (कुंडलिनी जागृती) करून मेंदूतील सहस्त्राचक्राची किमया त्यांनी साध्य केली असणार. ह्या वाक्याचा संबंध अजूनही आगम अशा शास्त्रात 'आत्मयज्ञ' ह्या पातळीचा आहे.

समाजात प्रचलित असणारी 'यज्ञ' संकल्पना ही पूर्णपणे अज्ञानी नक्कल व अजिबात खऱ्या अर्थाने फलदायी नाही. त्यामुळे त्याचे 'अॅडव्होकेट' त्याला 'द्रव्ययज्ञ' व वातावरणशुद्धी किंवा पर्जन्यप्राप्ति अशा भौतिकवादी फळनिष्पत्तीच्या वल्गना करतात. ही केविलवाणी धडपड होय. ह्यातून या विकृत यज्ञस्वरूपाला सोडवण्याची नितांत गरज आजही आहे. चिपळूणच्या यज्ञाचे जे कौतुक कै. डॉ. जोग या भांडारकर संस्थेच्या आदरस्थानी दिसणाऱ्या विद्वानाने केले, त्यावर मी 'दिशाच्या जुन्या अंकात सविस्तर

भाष्य व मीमांसा केली आहे. ही विकृती बुद्धाच्या काळापासून या शतकात विपळूणच्या 'यज्ञ संकल्पनेपर्यंत' जिवंत रहावी ह्याची खंत वाटते. म्हणून स्पष्टपणे लिहीले एवढेच.

त्यामुळे, "शिवपिंडी ही मूळ यज्ञप्रक्रियेचे स्थूल रूप" आहे. (हे उत्तराताईंचे विधान खरोखरच वाखणण्यासारखे आहे (पा. नं. २२५) पण 'यज्ञ' ही संकल्पना प्रत्यक्षात 'आत्मयज्ञ' ह्या आध्यात्मिक स्वरूपात साधनेत नेणे हे सध्याचे तरी महत्त्वाचे कार्य आहे असे मला मनोमन वाटते.

उत्तराताईंच्या इतर लिखाणाबद्दल मी एवढेच म्हणेन की त्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक 'पंचायतन' ह्या आशीर्वादपर लिहिलेल्या वासुदेव गोविंद चोरघडे, साहित्य वाचस्पती' यांच्या धारणेवर आधारून एक सामाजिक रूढीवर आधारलेला व थोडक्यात किंचित वरच्या पातळीवर ललित गद्याच्या धर्तीवर शोध निबंध लिहिला आहे. त्यांतील वैगुण्ये किंवा दोष काढण्याऐवजी आजच्या स्थितीला सगळ्या समाजाची व विद्वानांची, गुरूकुलांची ही 'ज्ञानाची पातळी' आहे. सी त्यांनी सत्यकथन केली असे म्हणावसे वाटते. ह्या मूळाक्षरांतून पुढे ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील प्रार्थनीय उद्दिष्टांकडे ही सज्जनांची मांदियाळी प्रवासकर्ती व्हावी ही प्रार्थना करून हे मीमांसापद्धतीचे विश्लेषण इथेच संपवितो!!

|| हरी ॐ ||

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,

सारस्वत बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.

दूरध्वनी - २५३६८४५०

मोबाईल - ९००४०५१८७७

E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

## कचरा टाळा, पर्यावरण सांभाळा

आपण सगळेच सतत निसर्गाजवळ जाण्याचा प्रयत्न करत असतो, पण निसर्गाजवळ जाऊन कळत-नकळत अशा अनेक गोष्टी करतो, ज्यामुळे निसर्गाचे नुकसान होऊन हानी पोचू शकते. तेव्हा पुढील गोष्टी टाळा...

- जंगलात गेल्यावर मोठ्याने बोलणे, गाणे टाळावे.
- कागद, प्लॅस्टिकचा वापर पूर्णतः टाळावा.
- निसर्गामध्ये असताना तेथलाच एक भाग होऊन निरीक्षणे करावीत, नोंदवावीत; आस्वाद घ्यावा.
- तेथून निघताना आपल्यामुळे झालेला कचरा आपल्याबरोबरच घेऊन यावा.
- निसर्ग पर्यटन आपल्याला कितीही आवडत असले तरी त्यावर काही प्रमाणात नियंत्रण ठेवावे.
- तेथील वन्य जीवनाला त्रास होणार नाही हे पाहा
- भडक रंगाचे कपडे घालणे, रेडिओ ऐकणे, मोबाईलवर बोलणे पूर्णतः टाळा.
- एखादा प्राणी दिसताच आरडाओरडा करू नका
- कोणाच्याही घरात शिरून त्याला त्रास देणे हे असंस्कृतपणाचे आहे. प्राण्यांच्या घरात असे वागू नका.
- झाडाचा कोणताही भाग, पान, काठी, फूल इ. उगीचच किंवा चाळा म्हणून तोडू नका.

# उत्कर्षाचे साधन (स्वामी रामतीर्थ)

परिशिष्ट २

*स्वामी रामतीर्थांसंदर्भातील लेख मालिका या लेखातील परिशिष्टासह संपत आहे. या लेखात उत्कर्षाच्या साधनांचा विचार व एकाग्रतेतील विघ्ने यांचा विचार मांडला आहे. - संपादक*

**उत्कर्षाचे पहिले साधन - उद्योग :**

काम करणे, त्याच्या पाठीस लागणे, त्याचा विचार पुरविणे हेच यश प्राप्तीचे मर्म आहे. घावावर घाव मारा हेच उत्कर्षाचे प्रथम तत्त्व आहे. उद्योगावाचून कोणी कधीही यशस्वी होणार नाही. जीवन कलहात आळशी माणूस मरतो, तो जगणार नाही.

मन लावून केलेले काम म्हणजे शांति होय. मन कामामध्ये इतके गढून गेले की मी काम करत आहे, ही भावनाच, नाहीशी होते. हे असे सतत केले जाणारे काम न कळत तुम्हांस उच्चतम योगाप्रत नेते.

दिव्याला यश प्राप्त व्हावे असे वाटत असेल तर त्याने जळलेच पाहिजे. त्याने आपली तेल वात राखून ठेवता कामा नये. आपल्या सर्व शक्तींचा उत्कर्ष करणारी एक दिव्य शक्ती आहे. या दिव्य स्थितीचा फायदा करून घेतल्यास तुम्ही आपली पराकाष्ठा करू शकाल. मग तुमच्या हातचे काम निर्दोष आणि सर्वांगसुंदर होईल.

ज्या मानाने तुमचे कर्म अकर्तृक होईल, मी करत आहे ही भावना सुटेल, मालकी गाजवण्याचे टाकून द्याल, त्या मानाने तुमचे कर्म चांगले वठेल. शरीर नेहमी कार्यरत असू द्या. अंतरात्मा स्थिररूप शांतीमध्ये अखंड असू द्या.

**उत्कर्षाचे दुसरे साधन - निष्काम कर्म, स्वार्थत्याग :**

ये केचिन् दुःखिता लोके सर्वे ते स्व सुखेच्छया। ये केचित् सुखिता लोके ते सर्वेऽन्य सुखेच्छया। आपला सर्व निधी आपल्याजवळ ठेवणे हे व्यवहारी ज्ञान होय. कोणतेही बीज, त्याचे रूप, व आकार यांचा नाश सर्व विधि आपल्याजवळ ठेवणे हे व्यवहारी ज्ञान होय. कोणतेही बीज, त्याचे रूप, व आकार यांचा नाश झाल्या विना उगवून वाढणार नाही. म्हणून उत्कर्षाची दुसरी आवश्यक गोष्ट स्वार्थत्याग होय. त्याग म्हणजे देह दमन नव्हे. त्याग हे शुभ्रतेचे गुह्य आहे. काळे पदार्थ सूर्यकिरणातील सर्व रंग शोषून घेतात कोणताच रंग परत देत नाहीत. कशाचाही त्याग करत नाहीत. ते त्यामुळे काळे कुळकुळीत असतात. पांढरे पदार्थ काही शोषून घेत नाहीत, कशावरही हक्क ठेवीत नाहीत, ते सर्वांचा त्याग करतात. स्वार्थाने काही बाळगून ठेवीत नाहीत. म्हणून ते शुभ्र चकचकीत कांतिमान, तेजःपुंज दिसतात. यशस्वी व प्रभावशाली व्हावयाचे असेल तर तुम्हांला अंतःकरणातील स्वार्थी धनीपणाची वृत्ती टाकून दिली पाहिजे.

**उत्कर्षाचे तिसरे तत्त्व प्रेम :**

विश्वाशी ऐक्यभाव व परिस्थितीशी अनुरूप होणे होय. प्रेम याचा अर्थ ज्याच्याशी आपले संबंध जडतात त्या सर्वांशी आपले ऐक्य आहे, हे आचरणात अनुभवणे होय. विश्वाशी आपले ऐक्य आहे. देव व आपण एकच आहोत हे तत्त्व पूर्णपणे समजल्याशिवाय व आचरणात आणल्याशिवाय तुमचा उत्कर्ष होणार नाही. जेव्हा तुम्ही सर्व आणि समष्टीरूप व्हाल तेव्हाच पूर्णता पावाल. हे अनुभवल्यानेच वेदान्त आचरणात येतो. जेव्हा मनुष्य निसर्गाच्या ऐक्याच्या तंत्राबाहेर जातो, तेव्हा त्याला दुःख भोगावे लागते. जेव्हा तुम्ही तुमच्या बांधवांशी ऐक्य अनुभवता तेव्हाच तुमचा अभ्युदय खात्रीने होतो.

**उत्कर्षाचे चौथे तत्त्व – उल्हास वा प्रसन्नता :**

उच्चनीच स्थिती माझी नसे मनापमानही। स्वकर्तव्य करा नीट। सर्व मान तिथे असे। आपले कर्तव्य नीट बजावीत राहाल, कार्याशी इमानाने वागाल, मग बाह्य मदती विषयी चिंता वाटण्याचे काही कारण नाही. मदत तुम्हांला शोधत येईल.

जेव्हा आपली छाया धरावयास तिच्या मागे धावतो, जेव्हा ती कधी सापडत नाही. ती आमच्या पुढे पळत राहाते. परंतु जेव्हा आपण छायेकडे पाठ करून सूर्याकडे धावतो तेव्हा ती मागून येते. बाह्य मदतीचे असेच आहे. हा सृष्टीचा कायदा आहे. कर्तव्य कर्म करणे, आपणच स्वीकारलेले काम करीत राहणे. हेच तुमचे भविष्य घडविणारे आहे. हे समजून आनंदाने उल्हासित मनाने कर्म करा, समाधान माना.

**उत्कर्षाचे पाचवे तत्त्व -- निर्भयता**

निर्भयता म्हणजे आपल्या आत्म्याविषयी स्वानुभव ज्ञान व श्रद्धा. भीतीचे स्थान म्हणजे शरीर. ज्या क्षणी आपण देहाभिमान सोडून देतो त्याक्षणी भयापासून मुक्त होतो. निर्भयता आणि वेदान्त अभिन्न आहेत. धरसोडीने आणि भीतीने तुम्ही आपणावर दुःखद स्थिती ओढून आणता कोणत्याही प्रसंगाने तुमचे स्वास्थ बिघडता कामा नये - सर्व काही तुम्हीच आहात. देहावरील आसक्ती दूर करा. कोणतेही संकट, संकटाच्या भीतीहून अधिक भयप्रद नसते. मरणाची भीती बाळगण्यापेक्षा मला मरण पत्करेल.

**उत्कर्षाचे सहावे तत्त्व – स्वावलंबन :**

आत्मविश्वास हे आनंदाचे वा सौख्याचे मूलतत्व आहे. स्वतःस हीन दीन दुर्दैवी पतित, पापी समजू नका असे वेदान्त सांगतो. तुम्ही अनंत आहात, सर्व शक्तिमान आहात ईश्वर आहात, अनाद्यनंत परमेश्वरच तुम्ही आहात, यावर विश्वास ठेवा. जेव्हा आपण दुसऱ्यावर अवलंबून असतो तेव्हा आपण जा जा असे म्हणतो. तदनुरूप सर्व काही जाते जेव्हा आपण स्वतःवर विसंबून असतो आणि आत्म्याव्यतिरिक्त कशावरही विश्वास ठेवीत नाही तेव्हा सर्व काही आपल्याभोवती गोळा होते. जर तुम्ही स्वतःला गरीब, तुच्छ, कीटक अथवा जंतु समजाल तर ऐश्वर्य तुम्हांला मिळेल काय? अशी तुमची भावना असते, तसेच तुम्ही होता. यो यत् श्रद्धेत् स एव सः।

आपण ईश्वर आहो ही भावना धरा, व ईश्वरत्वा विषयी पूर्ण श्रद्धा बाळगा, म्हणजे तुम्हांला कोणीही इजा करणार नाही, दुखविणार नाही. जोवर तुम्ही बाह्य शक्तीवर अवलंबून राहाल तोपर्यंत तुमच्या वाट्याला अपयश ठेवलेले. आपल्या हृदयातील ईश्वरावर विश्वास ठेवा व शरीर कार्यतत्पर ठेवा म्हणजे विजय सहज ठेवलेला.

बाह्य वस्तूपेक्षा सत्यावर अधिक विश्वास ठेवा, जेव्हा जेव्हा माणूस बाह्य वस्तूवर संपत्तीवर पूर्ण विश्वास ठेवतो तेव्हा त्याला खात्रीने अपयश येते. नियम असा आहे, ईश्वरावर निष्ठा ठेवा म्हणजे तुम्ही सुरक्षित राहाल. इंद्रियाच्या आहारी जाऊ नका.

**उत्कर्षाचे सातवे तत्त्व – पावित्र्य व सदाचार :**

खात्रीने यश देणारे तत्त्व म्हणजे पवित्र होय. असाधारण आसक्ती आणि अनिवार्य विषय वासना यांनी आयुष्याच्या चिंधड्या होतात. मानव जातीचे हित करण्याच्या विचाराने तुम्ही त्रास करून घेऊ नका. तुमच्या काळजीची नेहमीच अपेक्षा करण्याइतके जग दरिद्री का असावे? तुमच्या स्वतःच्या मुक्ती करता तुमचे शरीर खटपट करीत राहू द्या. ना आसक्ती ना द्वेष. पूर्ण समता असू द्या. तुम्ही प्रकाशाचे मूर्त स्वरूप व्हाल. कर्माचे सर्व ऐहिक हेतू टाकून द्या. वासना रूपी पिशाचांना गाडून टाका. आपले सर्व काम पवित्र करा. मोह आसक्ती काढून टाका. स्वार्थी आणि निंद्य हेतूने तुमचे सर्व व्यवहार व जीवनधर्म बाह्य

---

योग्य निर्णय घ्या, त्यामुळे काही लोकांचे समाधान होईल तर काहींना आश्चर्य वाटेल.

होते. कर्म तुम्हांला ईश्वराच्या जवळ पोचविते म्हणून देह व अहंकार या पासून स्वत:स अलिप्त ठेवून आचरा.

इच्छा रहित कर्म हे सर्वोत्तम त्याग वा भक्ती याचे हे दुसरे नाव आहे. कर्म करावयास हेतू कशास पाहिजे? सौख्य हे कर्मरूपवस्त्राने आपण दिलेले आहे. हे जाणल्याने तुम्हांस यश नेहमी आपल्या जवळ बाळगता येईल. हे विशाल विश्व तुमचे पवित्र मंदिर बनेल. तुमचे अखिल जीवन हे एक अखंड स्तोत्रच होईल. परिणामांची तुम्हांला काय पर्वा. प्राप्त कर्तव्य करण्याचा अनुमान करू नका. मानवाच्या निंदा स्तुतीवर भरवसा ठेवू नका. तुमचा स्वर्ग तुमच्यातच आहे. ईश्वराचे दर्शन घेण्यासाठी काही करावयास नको. वासनारूपी अंधकारमय कोश आपल्या भोवती तयार केले आहे ते नाहीसे केले पाहिजे. म्हणजे तुम्ही मुक्त आहात. लटक्या काळजा झाडून टाका. तुम्ही पूर्ण आहात, अनंत आहात, तुम्ही सर्व आहा. तुम्ही आपल्या मूळ तेजाने प्रकाशित व्हा.

*विश्वास तो दृढ धरा। परमात्मरूपचि की खरा।*
*बाळगिया दृश्य पसारा। सर्वथैव.*

स्वामी रामतीर्थ यांचे विचार

**एकाग्रतेत विघ्ने :**

**१) मिथ्या कारण सत्तेवर विश्वास :**

जोवर संसारातील पदार्थांच्या ठिकाणी तुम्हांला कारण सत्तेचे भान होत राहील - सर्व घडामोडींचे कारण एक ईश्वर आहे - हे ज्ञान तुम्हांला होणार नाही, तोवर पूर्ण शरणागतीचा आनंद तुम्हांला प्राप्त होऊ शकणार नाही.

आपल्या कामना, इच्छा सफल होण्याकरता धोरामोठ्यांची शिफारस, विद्या व ऐश्वर्य इत्यादिकांच्या नादी लागाल आणि आत्मदृष्टीचा आश्रय घेण्याचे नाकाराल तर संकटात पडाल, आणि दु:खी पावाल.

हे रामा, हे कार्य तुझेच आहे ते तुझे आहे म्हणूनच ते माझेही आहे. तुझी इच्छा तीच माझी इच्छा कार्य होवो न होवो मला त्यापासून हानी नाही किंवा लाभही नाही. तुझ्याशी अभेद भावाने राहण्यात मला आनंद वाटतो. कार्य तडीस गेले तरी वाहवा, बिघडले तरी वाहवा. तेव्हाच या श्लोकाचा अर्थ ध्यानी येतो.

*अनन्याश्चिन्तयन्तो मां येजना: पर्युपासते।*
*तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। गीता ९-२२*

**२) द्वैत दृष्टी :**

दुष्ट मनोविकार वाटेत मनुष्याला चोराप्रमाणे गाठून त्याला दूर घेऊन जातात. जोपर्यंत सर्व पदार्थांच्या ठिकाणी सम (सारखी) बुद्धी झाली नाही, जो पर्यंत समाधी कशी साध्य होईल. जोवर आपली दृष्टी विषम आहे तोवर समाधी, ध्यान, अगर धारणा साधणे अशक्य. बरे वाईटाची भावना अंतकरणातून नाहीशी होईल, तेव्हाच समदृष्टी उत्पन्न होईल.

**३) स्वार्थ कपट :**

सर्वस्वाचे अर्पण वा आत्मदान करणे हा उपासनेचा प्राण आहे. जोपर्यंत मन व अहंकार परमेश्वराच्या स्वाधीन करणार नाही, तोवर तो तुमच्या जवळ येऊन बसेल तरी कसा?

**४) प्रकृति नियमभंग :**

जोवर शारीरिक क्रिया उपासना रूप होणार नाहीत तोवर वरपांगी उपासना हे निव्वळ ढोंग आहे. उपासनेत आवश्यक गोष्ट उदारता. बाह्य स्थूल पदार्थांचे दान करता करता अति कठीण व सूक्ष्म वस्तूचे दान करण्यास, म्हणजे आपल्या चित्तवृत्ती हरिचरणी समर्पण करण्यास मनुष्य हळू हळू तयार होतो.

कोणती प्रार्थना ऐकली जाते? ज्या प्रार्थनेत स्वार्थाचा अंश इतका कमी असतो की, जणू काही सत्य स्वरूप परमात्म्याचीच ती इच्छा आहे असे वाटते. ती फलद्रूप होते. या स्थितीत सत्यकामना व सत्य संकल्प स्वभावत:च प्राप्त होतात.

*त्वमसि मम भूषणं त्वमसि मम जीवनं त्वमसि मम जलधिरत्नम्।*
*भवतु भवति इह मयि सततं अनुरोधित: तव्रमम हृदयं अतियत्नम्। जयदेव.*

तूच माझे भूषण, तूच माझे जीवन, तूच माझे रत्न, तुझ्या ठिकाणी अनुरक्त झालेले माझे हृदय तुझ्या ठिकाणी सतत जडलेले असो.

ईश्वरत्व आपणामधे आणावयाचे नसून ते स्वरूप नुसते जाणावयाचे आहे. नंतर त्याचा व्यवहारात उपयोग करावयाचा आहे. आपला आत्मा स्वभावत: अपवित्र आणि पापी मुळीच नाही, तो कोणाच्या पापामुळे अधोगतीला जात नाही, किंवा दुसऱ्या कोणाच्या पुण्याईमुळे तो तरत नाही.

यहुदी लोकांच्या निरनिराळ्या जाती असत आणि त्या प्रत्येक जातीचा देव निराळा असे इस्त्राइलच्या जातीच्या देवाला मॉलॉक (Molock) असे म्हणत. या निरनिराळ्या जातीत तंटे बखेडे होत इस्त्राइलच्या जातीला जय मिळाला येव्हा या जातीचा देव मॉलॉक सर्वात श्रेष्ठ देव ठरला. तो सर्व यहुदी लोकांचा देव झाला. सेमेटिक लोकांत एकेश्वरी मत असे स्थापन झाले. व ईश्वराला मालिक हे नाव मिळाले. या विषयाची अशी उत्पत्ती आहे.

आत्मस्वरूपाचा साक्षात्कार म्हणजे विस्मृत घर सापडणे होय. आपण कोण आहो, याचाच आपल्याला विसर पडला आहे.

वेदान्त सांगतो स्थिर स्थान तुमच्यातच आहे. ज्यावर उभे राहून सर्व पृथ्वी हालवता येईल. असे स्थान म्हणजे तुमचा आत्माच होय. त्याला घट्ट धरा म्हणजे सर्व विश्व तुम्ही हलवून सोडाल.

आत्मज्ञान करून घेण्यासाठी कोणत्याही बाह्य गोष्टीवर अवलंबून राहू नका. मी ईश्वर आहे याचा अर्थ मी म्हणजे माझा क्षुद्र अहंकार ईश्वर आहे असा होत नाही.

प्रत्यक्ष वाद – दिसतात त्या प्रमाणे वस्तु खऱ्या आहेत.

कल्पनावाद – जग दिसते तसे ते नाही. जग आहे पण आम्हांला दिसते तसे ते नाही. बर्कले, फिख्कट, प्लेटो, कांट, हेगेल, शेले हे कल्पनावादी पण यांच्या कल्पनावाद कल्पनेत फरक आहेत. बेल, मिल्ल हे प्रत्यक्षवादी.

स्वामी रामतीर्थ यांचे विचार

**श्री. शं. वा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

## ग्रंथ प्रसारक

दिशाचे एक चाहते, लेखक व न चुकता दिशा वाचणारे डोंबिवलीचे श्री. **शरद जोशी** ग्रंथप्रसारक म्हणून सर्वज्ञात आहेत. आपण ग्रंथ वाचल्यावर तो इतरांनीही वाचावा या तळमळीच्या भावनेतून ते त्या ग्रंथाची माहिती सर्व लहान मोठ्या नियतकालिकांना पाठवतात. तो ग्रंथ वाचा, असे अनेकांना सुचवतात. त्यांचे हे ग्रंथप्रेम दुर्मीळ व उल्लेखनीय आहे.

अंधार नसता तर चमकणाऱ्या ताऱ्यांना काही किंमतच उरली नसती – अज्ञात

# मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर

*गुरुदेव रविन्द्रनाथ टागोरांच्या प्रार्थनांची ही भाषांतरे मूळ कवितेतील नजाकत भाषांतर शैलीतून कशी उतरली आहे ते आवर्जून पाहण्यासारखे आहे. - संपादक*

*प्रार्थना ३७*

*Thought that my voyage had come to its end*
*at the last limit of my power,*
*that the path before me was closed,*
*that provisions were exhausted and*
*the time come to take shelter in a silent obscurity.*
*But I find that thy will knows no end in me.*
*And when old words die out on the tongue,*
*new melodies break forth from the heart;*
*and where the old tracks are lost,*
*new country is revealed with its wonders.*

*प्रार्थना ३७*

वाटले मला की संपली माझी भ्रमंती
जाहली परिपूर्ण आता सारी कुवतची माझी.
वाटले मला कीं मजसमोरील मार्ग आहे बंद झाला
वाटले असे की संपली आहे सर्व रसद माझी.
आणि येवूनी ठेपली वेळ घेण्या नीरव आसरा शांततेचा .

परंतु आता तर दिसते की तंव इच्छाच की, होऊ नयेची अंत माझा
आणि जोवरी बिरतची नाहीत जुने शब्द माझ्या वाचेतूनी
नवनवीन कवने घेती उन्मेष माझ्या इवल्या ह्रदयांतुनी,
संपती ना संपती जुन्या वाटा जंववरी दिसतो अद्‌भुत रम्य असा
नवनवाच प्रदेश माझ्या प्रतिभेचा तव देशांतरी.

प्रार्थना ४९

*You came down from your throne and*
*stood at my cottage door.*
*I was singing all alone in a corner, and*
*the melody caught your ear. You came down and*
*stood at my cottage door.*

*Masters are many in your hall, and songs*
*are sung there at all hours. But the simple carol*
*of this novice struck at your love.*
*One plaintive little strain*
*mingled with the great music of the world,*
*and with a flower for a prize you came down*
*and stopped at my cottage door.*

प्रार्थना ४९

सोडूनी सिंहासन तुझे आलास खाली उतरूनी
आणि राहिलास उभा दारात माझ्या झोपडीच्या

गात बसलो होतो मी एकलाच कोपऱ्यात बसूनी
आणि माझे ते गीतगुंजन बाटे पडले कानी तुझ्या
आलास उतरूनी खालती दारात माझ्या झोपडीच्या

आहेत बहुसाल गंधर्व तुझीया दरबारी मी जाणतो
गात असती सतत सुस्वर गीते सदा सर्वदा सर्वकाळी
परी साधीच भाक या अडाण्याची आवडली का तुला प्रेमाची?
एक साधाची बारीक करुणेचा धागा मिसळला महान संगीतात
या जगताच्या आणि घेवूनी या बक्षीसी एका फुलाची
उभा राहिलास दारात माझ्या झोपडीच्या

- असीम

सुख हे मानवतेच्या सौजन्यशील स्पर्शात आहे; अहंकारातून उद्भवलेल्या हर्षात नाही.

# साहित्य - जगत

*श्री. शरद जोशी यांनी करून दिलेला ग्रंथ परिचय - संपादक*

**गुरुवर्य वा. ल. कुलकर्णी स्मृतिग्रंथ -**

ज्येष्ठ आणि श्रेष्ठ समीक्षक कै. वा. ल. कुलकर्णी यांची जन्मशताब्दी ७.४.२०१२ रोजी पूर्ण झाली. त्यानिमित्त गुरुवर्य वा. ल. कुलकर्णी स्मृतिग्रंथ (संकलन-संपादन प्रा. शिल्पा तेंडुलकर, ७६/१० हंसिका दर्शन, गारोडियानगर, घाटकोपर-पूर्व मुंबई - ४०००७७, पृ. ३९८ मूल्य रु. ३००/-) हा दर्जेदार ग्रंथ श्री. अरुण ब. मैड यांच्या चांदणवेल प्रकाशन (गणेश ४७२, साईविभाग, अंबरनाथ-पू. जि. ठाणे-४२१५०१,) संस्थेने ७-४-२०१२ रोजी प्रकाशित केला आहे.

**नामवंतांचे लेखन :**

या अपूर्व ग्रंथात कै. नरहर कुरुंदकर, कै. श्री. पु. भागवत कै. ज्ञानेश्वर नाडकर्णी, रसाळ, इ. प्रतिभावंत साहित्यिकांनी आणि त्यांच्या हजारो विद्यार्थ्यांपैकी काहींचे लेख आहेत. सारे लेख उत्तम व वाचनीय आहेत. कै. नरहर कुरुंदकरांचा २५ पानी लेख (वा. ल. कुलकर्णी एक समीक्षक; मूळ प्रसिद्धी - १९६५ मध्ये हैद्राबाद येथे ४६ वे अ. भा. साहित्य संमेलनाचे वा. ल. अध्यक्ष होते. त्यावेळी प्रतिष्ठान मासिकाने वा. ल. कुलकर्णी विशेषांक प्रसिद्ध केला होता. त्यामध्ये हा लेख होता) अप्रतिम आहे. तर डॉ. विजया राजाध्यक्ष यांनी घेतलेली वा. लं. ची प्रदीर्घ मुलाखत (पृ. ११० ते १७४; मूळ प्रसिद्धी 'संवाद' या पुस्तकात) आहे. प्रकाशक अरुण मैड त्यांच्या 'परिसस्पर्श' या प्रस्तावनेत ते म्हणतात, "मराठी भाषेच्या प्रत्येक अभ्यासकाच्या विद्यापीठीय प्रवासात गुरुवर्य वा. ल. कुलकर्णी हे महत्त्वाचे जंक्शन. वारीला जाताना जसे आधी ज्ञानोबांचे दर्शन, नंतर विठोबाचे, तसे पदवीचा विठ्ठल लाभावयाचा असेल तर आधी वा. लं. च्या समीक्षा-आळंदीला जावे, तिथला गुलालबुक्क्याच्या या गुरुवर्यांची थोरवी. गुरुवर्य हे एक समीक्षेचे विद्यापीठच होऊन उभे ठाकले. ज्यांना हे भाग्य लाभले, त्यांचे आयुष्य सोन्याचे झाले."

**वा. लं. ना गुरुपद प्राप्त :**

या ग्रंथाच्या संकलक संपादक प्रा. शिल्पा तेंडुलकर आपल्या 'ऋणनिर्देश' मध्ये म्हणतात -

"वा. लं. ना हे गुरुपद मिळालं ते त्यांच्या स्वत:च्या स्वतंत्र वैचारिक शिस्तीच्या घडणीत. त्यांचा साक्षेप आणि तोही सामग्र्यानं त्यांच्या अस्तित्वात अशी काही अनुस्यूत होता की ती समग्र धीरगंभीर ज्ञाननिष्ठा आणि त्यांची अध्यापकीय अधिकारवत्ता यांमुळे ते गुरुवर्य म्हणवले गेले. त्यांच म्हणून एक School जणू 'गुरुवर्य' तयार झालं ही प्रगाढ प्रचिती विद्यार्थ्यांच्या मनात झिरपत राहिली. किती विविधांगानी किती स्वयंनिर्मित, किती समग्र सुसंगतीनं, किती कुतूहलानं आणि शोधकतेनं गुरुकुल रूप धरत आलं, घडत आलं, घडवत आलं ... भारतीय संस्कृतीत, गुरुकुलाचं, गुरुत्वाचं अनन्य महात्म्य! जे 'लघु' नाही ते गुरु! आणि हे गुरुत्वही कसं तर मातृदेव, पितृदेव नंतर आचार्यदेव ह्यांचे महत्त्व (वा. लं. च्या बाबतीत खरोखर हे तीन ही संस्कार एका ओळीत जणू!)"

**माहितीपूर्ण परिशिष्ट :**

या ग्रंथराजाच्या सुरुवातीस वा. ल. कुलकर्णी यांची

जीवनरेखा देण्यात आली आहे. नंतर 'मी: वा लं'चे आत्मकथन (पृ १५ ते ३७; मूळ प्रसिद्धी 'एका पिढीचे आत्मकथन या पुस्तकात) पुस्तकाच्या शेवटी परिशिष्ट एक मध्ये वा. लं. चे सन्मान, सत्कार यांची माहिती दिलेली आहे. परिशिष्ट दोन मध्ये वालंच्या निधनानिमित्त (२५-१२-१९९१) विविध दैनिकांनी त्यांना वाहिलेल्या श्रद्धांजलीचे लेख दिलेले आहेत. परिशिष्ट तीनमध्ये डॉ. विजया राजाध्यक्ष (आधारवड कोसळल्यानंतर) कै. डॉ. सरोजिनी वैद्य ('साक्षेपी समीक्षक') यांचे अत्यंत महत्त्वाचे लेख दिलेले आहेत. परिशिष्ट चार मध्ये वा. ल. यांच्या ग्रंथसंपदेची सूची दिलेली आहे. अभ्यासकांना ती उपयुक्त आहे.

एकंदरीत सर्व विद्यार्थी-शिक्षक प्राध्यापक लेखक, वाचक समीक्षक, मराठी साहित्याचे अभ्यासक यांना उपयुक्त असलेला हा ग्रंथराज परिश्रम पूर्वक साकार केल्याबद्दल प्रा. शिल्पा तेंडुलकर आणि तो प्रसिद्ध केल्याबद्दल चांदणवेल प्रकाशनाचे अरुण मैड (अंबरनाथ जि. ठाणे) या उभयतांचे मन:पूर्वक अभिनंदन. सर्व ग्रंथालयांनी आणि साहित्य संस्थेत तो आपल्या संग्रही ठेवावा ही नम्र विनंती.

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६१६७

•••

दिशा संपर्क दूरध्वनी
०२२-२५४२ ६२७०

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावंस ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सांत्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर

# श्री स्वामी समर्थ केन्द्र, पिंपळभाट, अलिबाग

*अलिबागजवळील पिंपळभाट गावातील स्वामी समर्थ केंद्राच्या कार्यक्रमाबद्दलचे वृत्त मुद्दाम देत आहोत. यापासून प्रेरणा घेऊन असे कार्यक्रम व उपक्रम आपल्यालाही चालू करता येतील का याचा आत्मशोध घ्यावा - संपादक*

१ मे हा तसा धामधुमीचा असंख्य कार्यक्रमांचा दिवस. गल्लीबोळापासून जागतिक स्तरापर्यंत पूर्वी कामगार दिन म्हणून साजरा होणारा. गेली ५० वर्षं महाराष्ट्रात तो महाराष्ट्र दिन म्हणूनही साजरा होतोय. यावर्षी स्वामी समर्थ केन्द्र, पिंपळभाट, अलिबाग याठिकाणी पालकदिन सोहोळ्यास हजर राहण्याचा योग आला. एका मंदिरात अथवा मठांत पालकदिन साजरा करण्याचं प्रयोजन काय, असंच कुणालाही वाटेल.

अलिबागच्या अलीकडे २/३ किलोमीटर, पिंपळभाट नावाच्या गावात 'स्वामी समर्थ नगर' नावाची एक वसाहत उभी राहिली आहे. मुख्य रस्त्यावरून वसाहतीत आणि विशेषत: स्वामी समर्थ केन्द्राच्या परिसरात प्रवेश केला की एका अगम्य शांतीचा प्रत्यय येऊ लागतो. कधीही गेलं तरी या परिसरात दिसणारी स्वच्छता, नीटनेटकेपणा पाहून मन प्रसन्न होतं. मठ म्हटला की आपल्या डोळ्यासमोर एक रुक्ष आणि नीरस वातावरण उभं राहतं, पण या मठाचा सारा परिसर शांत, सुंदर आणि मंगलमय असा आहे. इथली वृक्षराजीसुद्धा निरनिराळे मजेदार आकार धारण करून उभी राहिली आहे. परमेश्वर हा जसा प्रेममूर्ती आहे तसाच तो सौंदर्यमूर्तीही आहे. सत्यम् शिवम् सुंदरम्चा अनुभव प्रत्ययकारी आहे हे आपण विसरू नये अशीच सारी व्यवस्था आहे.



श्री. व सौ. रिसवाडकर

१५/२० वर्षांपूर्वी जेव्हा ही वसाहत निर्माण झाली तेव्हा नुकतेच निवृत्ती घेतलेले मनोहरपंत रिसवाडकर एक बंगला बांधून इथे वास्तव्यास आले. स्वामी समर्थांची भक्ती चालूच होती. स्वामींच्या कृपेने आणि इच्छेने हळूहळू भक्तगण गोळा झाले. आणि हां हां म्हणता एक सुंदर असं मंदिर उभं राहिलं. या मंदिराचं वैशिष्ट्य हे आहे की, या मंदिरात दान पेटी नाही. भक्तांनी भक्तांच्या माध्यमातून सर्व भक्तांसाठी साकार केलेलं भक्त मंदिर, असं या मंदिराचं स्वरूप.

या सर्व निर्मितींच्या आणि त्यातील कल्पकतेच्या मागे काहीसे त्रयस्थपणे उभे असणारे श्री मनोहरपंत रिसवाडकर ज्यांना या परिसरातील सर्व आबालवृद्ध आदराने काका म्हणतात, ते मूळचे ठाण्याचे. माझे बालमित्र आणि वर्गमित्रही. खारकर आळीत वास्तव्यास असताना आर्य क्रिडा मंडळात त्याना सांघिक कवायतीचे, देशी खेळांचे आणि विविध व्यायाम प्रकारांचे संस्कार तर लाभलेच; पण त्याशिवाय आर्य क्रीडा मंडळाच्या स्थापनेत अंतर्भूत असणारी सामाजिक जाणिवेची प्रेरणाही प्राप्त झाली. व त्यासच पुढे स्वामी समर्थ भक्तीची जोड मिळाली.

आज आपण अनेक मंदिरं पाहतो जेथे असंख्य भक्तांचा आणि त्यांच्या भक्तीचा महापूर लोटलेला दिसतो. पण हे सारे भक्त आजच्या परिस्थितीनं बनवलेले आर्त

---

माणसाची पारख तो काय प्रश्न विचारतो यावरून करा, तो देत असलेल्या उत्तरांवरून नको. - व्हॉल्टेअर

आणि अर्थार्थी भक्त असतात. भगवंतानं सांगितल्याप्रमाणे त्यांची जिज्ञासा जागृत व्हायला हवी. शिवाय त्यांना भगवंतासाठी कांही तरी कर्म करण्याची प्रेरणा व्हायला हवी. वस्तुत: समाजाला ही दिशा दाखवणं हे मंदिराचं कार्य. आमच्या ठाण्यातील कौपिनेश्वर मंदिरात आदरणीय श्री शंकररावजी मठ यांच्या प्रेरणेने ज्ञान केन्द्राचे कार्य चालू आहे. पण अशी मंदिरे विरळाच.



गुरुजनांचा सत्कार

स्वामी समर्थ केन्द्रात येणारे अनेक भक्त केन्द्राच्या निरनिराळ्या उपक्रमांत सहभागी होऊन या परमेश्वरी कार्यात आपला खारीचा वाटा उचलताना दिसतात. परंतु या भक्तीमार्गी कर्मयोगाला ज्ञानाची जोड हवी. खरं ज्ञान तेच की जे बुद्धीला शुद्ध, निर्मळ आणि पवित्र करतं. असं ज्ञान ज्या भाषेत उपलब्ध आहे ती देवभाषा प्रथम शिकायला हवी. कोरडा उपदेश कामाचा नसतो, हे तत्व सांभाळणाऱ्या मनोहरने निवृत्तीनंतर संस्कृतचा अभ्यास सुरु केला. त्यासाठी तो आठवड्यातून दोन दिवस पेणला जातो. आणि ९० वर्षीय थोर संस्कृत शिक्षक श्री रामेश्वर शास्त्री उर्फ तात्यासाहेब कर्वे यांचेकडे संस्कृतचे धडे घेतो. अशा तऱ्हेने प्रथम स्वत: शिक्षित होऊन परिसरातील इतरानाही तो संस्कृतचे धडे देऊ लागला आहे.

परंतु हा सारा योग साध्य करायचा असेल तर त्यासाठी परमेश्वराने मानवाला शरीर आणि मन ही दोन साधन दिली आहेत. ही दोन्ही साधने परिपूर्ण नाहीत. त्यांना परिपक्व करावं लागतं. शारीरिक व्यायाम आणि योगासनं करून शरीर सुदृढ होतं तर मनाला सुसंस्कारित करण्यासाठी सत्संग, स्वाध्याय इत्यादींची जोड द्यावी लागते. पण हे सारं नियमितपणे करण्यासाठी शिस्त लहानपणापासून अंगी बाणवावी लागते.

आणि म्हणूनच मनोहरनं लहान मुलांसाठी असं संस्कार केन्द्र सुरू केलं तसंच मठाच्या बाजूलाच एक व्यायामशाळाही सुरू केली आहे. या व्यायामशाळेत आणि संस्कार केन्द्रांत येणाऱ्या मुलांनी केलेली प्रगती त्यांच्या पालकांना कळावी, यासाठीच १ मे चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



मल्लखांब

जवळ जवळ १०० मुलामुलींनी निरनिराळ्या प्रकारच्या सांघिक कवायती अत्यंत शिस्तबद्ध अशा

पद्धतीने करून दाखवल्या. डंबेल्स्, लेझिम, रिंग इत्यादी साधनांचा वापर करूनही काही कवायती झाल्या. मल्लखांबावरच्या कसरती आणि पिरॅमिडस् तर चित्तथरारक होते. साऱ्या हालचाली बँडच्या तालावर अतिशय रेखीव वाटल्या. कार्यक्रम सादर करण्यासाठी येणारा प्रत्येक गट येताना व जाताना शिस्तबद्ध हालचाली करत होता. कुठेही गडबड गोंधळ नव्हता. वेळेचा अपव्यय नव्हता.

शारीरिक कवायतींच्या जोडीनंतर १० मुलांनी रामायण- महाभारतातील कांही निवडक श्लोक अत्यंत सुस्पष्ट उच्चारांत सादर केले. विशेष म्हणजे प्रत्येक श्लोक म्हटल्यावर त्याचा भावार्थ सुलभ अशा संस्कृत भाषेतून छोट्या छोट्या वाक्यांतून स्पष्ट करून सांगितला.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्ञानप्रबोधिनीचे श्री. यशवंत लेले, संस्कृत भाषा शिकवण्याचा ध्यास घेतलेले श्री रामेश्वरशास्त्री तथा तात्यासाहेब लेले आणि श्री भगत यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

विशेष म्हणजे जवळ जवळ १००/१२५ मुलांना बरोबर घेऊन निरनिराळ्या प्रकारची अनेक प्रात्यक्षिके सादर करताना संपूर्ण नियोजन इतकं उत्तम होतं की ठरल्याप्रमाणे बरोबर २ तासांत कार्यक्रम संपला.

स्वामी समर्थ केन्द्राच्या माध्यमातून अत्यंत अल्पावधीत मनोहरनं जे कार्य उभं केलं आहे, ते कौतुकास्पद आहे. माझ्यासारख्या बालमित्रांनी कौतुकाचे दोन शब्द उद्गारले तर मनोहर म्हणतो "अरे मी काय केलं? सारं महाराज करताहेत, करून घेताहेत. मी फक्त निमित्तमात्र आहे. खरं आहे. पण महाराज जेव्हां एखादं कार्य उभं करण्याचं ठरवितात तेव्हा ते प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांना एखादं साधन शोधावं लागतं. एखाद्या व्यक्तीस आपलं Instrument म्हणून घ्यावं लागतं आणि असं साधन तावून सुलाखून घेतल्यावरच महाराज ते कार्य त्याच्या हाती सुपूर्द करतात आणि म्हणूनच इतर अनेक मंदिरं आणि मठासमोर पिंपळभाट अलिबागच्या स्वामी समर्थ केन्द्राचा आदर्श उभा राहतो.

श्री. नरेन्द्र नाडकर्णी
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी - २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

## पवनचक्की

ख्रिस्टोफर हॅमिंग (निद्रा विशेषज्ञ, लायसेस्टर) व असून इव्हान्स (क्वीन्स विद्यापीठाच्या सेंटर फॉर पब्लिक हेल्थ येथील प्राध्यापक) यांच्या एका अभ्यासातून त्यांनी असे सिद्ध केले आहे की ध्वनिप्रदूषणामुळे विशेषत: पवनचक्कीच्या आवाजामुळे) व्यक्तीच्या झोपेवर गंभीर परिणाम होतो. मानवी आरोग्याच्या दृष्टीने झोप हा महत्वाचा घटक आहे. विशेषता लहान मुलांना झोपेची जास्त गरज असते.

रस्त्यावरील, विमानांची व लोह मार्गावरील वाहतूक यांचा तर परिणाम होतोच पण घराच्या जवळ उभारण्यात आलेल्या पवन चक्क्यांचा आवाज झोपेची वेळ व दर्जा यावर परिणाम करतो. या संदर्भातील संशोधनाची माहिती बीएमजेच्या २० एप्रिलच्या अंकात आली आहे. ध्वनिप्रदूषणावर काम करणारांना या संशोधनाचा उपयोग होऊ शकतो.

संदर्भ - बीएमजे २० एप्रिल २०१२ खंड ३४४:१.५२

आंतरराष्ट्रीय प्रमाणित क्रमांक (ISSN) संच (१७५९-२१५१) पृ. क्र. १२

आपल्याला अनपेक्षितरित्या कधी सुवर्णसंधी मिळते याची वाट न पाहता, हाती आलेली एखादी साधी संधीही दवडू नका

# सावरकरांची काव्य व नाटके

*स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्यावरील स्पर्धेसाठी आलेला हा लेख. वि.प्र.मंडळाने दोन वर्षांपूर्वी ही स्पर्धा घेतली होती. – संपादक*

*राष्ट्राचे चैतन्य मूर्त तू नीति संपदांची।*
*स्वतंत्रते भगवती श्रीमती राज्ञी तू त्यांची।।*

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ या दिवशी नाशिक जिल्ह्यात भगूर येथे झाला. विनायकांचे वडील दामोदरपंत हे विद्वान होते. ते कविताही करत असत. विनायकांच्या मातोश्री राधाबाई या धर्मनिष्ठ व दयाळू होत्या. विनायकाचे मोठे बंधू गणेशपंत, विनायकाचा धाकटा भाऊ नारायण. त्यांना एक बहिण होती.

सावरकरांचे घराणे प्रसिद्ध होते. मराठेशाहीत पराक्रम गाजवल्यामुळे दामोदरपंताच्या पूर्वजांना लहानशी जहागीर मिळालेली होती. छोटे कुटुंब सुखसमाधानाने कालक्रमणा करीत होते. दामोदरपंत छोट्या विनायकाला महाभारतातल्या व महाराणा प्रताप, शिवाजी महाराजांच्या कथा सांगत. विनायकाने काव्याची दीक्षा वडिलांकडूनच घेतली.

विनायकला वाचनाचा विलक्षण नाद लागला. मिळतील ती पुस्तके वाचण्याचा त्याने सपाटा लावला. विनायकाला निबंधमाला आवडू लागली. 'केसरी' चे वाचन नित्याचे झाले. मराठ्यांच्या व राजपूतांच्या इतिहासात त्याचे मन रमू लागले. पुण्यातील वृत्तपत्रांत विनायकाच्या लेखांना व काव्यांना प्रसिद्धी मिळू लागली.

१८९७ च्या जून महिन्यात ब्रिटिश अधिकाऱ्यांना चाफेकर बंधूंनी यमसदनी पाठवले. सरकारबद्दल चीड आल्याने त्यांना स्वास्थ्य नकोसे झाले. चाफेकरांचे अपुरे कार्य तडीला नेण्याचा त्याने निश्चय केला.

*उत्कर्ष आणि अपकर्ष समान ठेले*
*विश्वात आजवरी शाश्वत काय झाले?*

चाफेकरबंधूंच्या आत्मसमर्पणाने विनायकाच्या मनाची पकड घेतली. त्याने चाफेकरांवर उत्कृष्ट पोवाडा रचला. चाफेकरांच्या हौतात्म्यावर एक नाटकही लिहिले. चाफेकरांच्या हौतात्म्यावरील पोवाड्याने वीरांचे बाहू स्फुरण पावू लागले. दामोदरपंत चाफेकर व त्यांच्या पत्नी यांचे शब्दचित्र पोवाड्यात रेखाटण्यात आले.

*लालभडक ते नेत्र चमकती, हस्त स्फुरती, धीर मना*
*श्री दामोदर सिद्ध जाहला जावयालागी खलस्थना*
*कान्ती वदली "कान्ता जाता देशहिताला करावया*
*पतिराया घ्या निरोप जावे त्वरित कीर्तिला वरावया।"*



स्वातंत्र्यवीर सावरकर

विनायकाने आपल्या वडिलांना - अण्णांना पोवाडा म्हणून दाखविला. अण्णांचे हृदय भरून आले. विनायकाला जवळ घेत अण्णा म्हणाले, '' तात्या, तुझे वय अजून लहान आहे. तुझ्या सुकुमार देहाला क्रांतिकारकांची कठोर तपश्चर्या झेपणार नाही. मोठा बाबा व धाकटा बाळ यांची जबाबदारी तुझ्यावरच आहे. तू म्हणजे आमच्या घराची आशा आहे. या मार्गाकडे इतक्यातच वळू नको. मोठा हो, मग पाहिजे ते कर.'' वडिलांचा सल्ला तात्यांना फारसा रुचला नाही तात्यांचे कार्य चालूच राहिले.


भगूर येथे सार्वजनिक गणेशोत्सवात तात्यांनी पहिले जाहीर भाषण केले. अण्णांचे कान तृप्त झाले. शिक्षणाकरता भगूरहून तात्या नाशिकला आले. गणेशोत्सवात भाग घेऊ लागले. लेखन - वाचन सुरूच होते. आपले शरीर कणखर बनविण्याकरता तात्यांनी नियमितपणे व्यायाम घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या शरीराला आकार येऊ लागला.

नाशिक येथे वार्षिक वक्तृत्व स्पर्धा सुरु झाल्या तात्यांना वेळेवर नाव देता आले नाही. त्यामुळे त्यांना शेवटचे बोलण्याची संधी देण्यात आली. शेवटी बोलून तात्यांना पहिले बक्षीस मिळाले. बक्षीस समारंभाचे वेळी अध्यक्ष म्हणाले, ''विनायक सावरकर याचे भाषण चांगले झाले. परंतु त्याचे बालवय पाहता ते त्याने लिहिले असे वाटत नाही.'' तात्या ताडकन् उभे राहून म्हणाले, ''हे भाषण सर्वस्वी माझे आहे. हे लिहताना मला अनेकांनी पाहिले आहे. शहाणपण वयात नसते. लहान वयातच ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहली. 'गुणा: पूज्यास्थानं गुणिषुनच लिंग न च वय:।'' तात्यांचा हजरजबाबीपणा पाहून सारी सभा अवाक् झाली.

भगूर गावात प्लेगने हाहा:कार उडविला. प्लेगच्या साथीला अण्णा बळी पडले. तात्यांचे पितृछत्र हरवले. वडिलांच्या नंतर अवघ्या दहा दिवसात तात्यांचे चुलते वारले. त्यानंतर सावरकर बंधूनी भगूर कायमचे सोडले व नाशिकला राहण्यास सुरुवात केली.

*जे जे उत्तम उदात्त उन्नत महान्मधुर ते ते ।*
*स्वतंत्रते भगवती सर्व तव सहचारी होते ।।*

बाळ नाशिक येथील दवाखान्यात असताना बाबांची श्री. म्हसकर यांच्याशी ओळख झाली. म्हसकर कारकुनाचे काम करीत होते, परंतु विचार स्वातंत्र्याचे होते. डोक्यात राजकारण खेळत होते. श्री. पागे हे म्हसकरांचे स्नेही! म्हसकर व पागे 'काळ' पत्रात 'एम. पी' या नावाने लेख लिहीत असत. सावरकरबंधूजवळ त्यांची मैत्री जमली. लोकमान्यांच्या 'केसरी' चे भक्त होते. याच वेळी तात्यांचा कवी गोविंद उर्फ आबा दरेकर यांच्याशी परिचय झाला. दरेकर अपंग होते. परंतु त्यांची प्रतिमा अद्वितीय होती. तात्यापेक्षा वयाने ते मोठे होते. तात्यांनी रचलेला चाफेकरांचा पोवाडा ऐकून दरेकरांना अतिशय आनंद झाला. दोघेही एकाच भावविश्वात वावरू लागले. जिवंत काव्याची बिजली कडाडू लागली. स्वातंत्र्यशाहीर कवी गोविंद व स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकर स्वातंत्र्यलक्ष्मीचा जयजयकार करू लागले.



**सेल्युलर जेल**

चळवळीचे रणशिंग फुंकले. विद्यार्थी संघाची स्थापना झाली.चळवळीची सूत्रे तात्यांनी हाती घेतली. तात्यांची ज्ञानसंपदा, अमोघ वक्तृत्व, प्रभावी काव्यरचना,

खुली चर्चा आणि पारदर्शकता हा समक्ष लोकशाहीचा कणा असतो.

गगनाला गवसणी घालणारी महत्त्वाकांक्षा पाहून मंडळी भारून जाऊ लागली.

१८९९ च्या नोव्हेंबरमध्ये 'राष्ट्रभक्त समूह' ही गुप्त संघटना काढण्यात आली. ''स्वातंत्र्यलक्ष्मी प्रसन्न'' हे ब्रीदवाक्य होते. दि. १ जानेवारी १९०० रोजी या संस्थेचे नाव 'मित्रमेळा' करण्यात आले. मित्रमेळ्याने गणेशोत्सव व शिवाजी उत्सव नाशिकमध्ये धुमधडाक्याने साजरे करण्यास सुरुवात केली. तात्यांच्या प्रभावी भाषणांनी नाशिक दणाणू लागले.

'पेशव्यांत थोर कोण?', ह्या तात्यांच्या निबंधाला पहिले बक्षीस मिळाले. व महाराष्ट्राचे लक्ष सावकरांकडे वेधले गेले. तात्या पब्लिक सर्व्हिसची परीक्षा पास झाले. आपल्या बुद्धिमान भावाने नोकरी करावी हा विचार बाबांना पटला नाही. वाटेल ते हाल सोसून तात्यांचे शिक्षण पुरे करण्याचा मनोदय त्यांनी जाहीर केला. १९०१ सालच्या डिसेंबर महिन्यात तात्या मॅट्रिकची परीक्षा पास झाले. कॉलेजमध्ये नाव घालण्याबाबत बोलणी सुरू झाली.

याच वर्षी तात्यांचा आयुष्यातील महत्त्वाची घटना घडली. जव्हार संस्थानामधील वजनदार गृहस्थ श्री. भाऊराव चिपळूणकर यांच्या कन्येबरोवर तात्यांचा विवाह झाला. आपल्या बुद्धिमान जावयाचे उच्च शिक्षण पुरे करण्याची जबाबदारी चिपळूणकरांनी आनंदाने पत्करली. कॉलेज शिक्षणाकरता तात्या पुण्याला आले. फर्ग्युसन कॉलेजात त्यांनी प्रवेश केला. पुण्याला येताच तात्यांनी कार्याला सुरुवात केली. 'शिवप्रभू' हे तात्यांचे दैवत होते व स्फूर्तिस्थान होते. सर्वस्व होते. 'श्री शिवगीत' या काव्यात तात्यांनी लिहले होते.

*नेती धर्मलयाते छळिती गो – द्विजकारा यवनकरते।*
*श्री शंकर शिवरुपे धर्माचे जाहले अवनकरते।।*
*शिवराज हृदय सुपटी बोधामृत ओतिले जिजाईने।*
*की आम्रवन सुगंधे भरले सुमने करोनि जाईने।।*

महाविद्यालयीन मोकळ्या वातावरणात तात्यांच्या प्रतिभेला बहर आला. एकदा मित्रमंडळीसह तात्या सिंहगडावर गेले. स्फूर्तीचे किरण चमकू लागले. तात्या उद्‌गारले:

*धन्य शिवाजी, तो रणगाजी, धन्यचि तानाजी।*
*प्रेम आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी।।*

नरवीर तानाजीरावांच्या आत्महोमाचा पोवाडा तयार झाला. त्यातील ओळींनी महाराष्ट्राला मोहिनी घातली. त्यानंतर तात्यांनी लिहलेला वीर बाजीप्रभूंचा पोवाडाही फार गाजला. त्यातील काव्यपंक्ती तरुणांच्या ओठावर नाचू लागल्या. पोवाडा ऐकण्याकरता शाहीराने समस्त राष्ट्रवीरांना आवाहन केले.

*स्वतंत्रेच्या। रणात मरुनि चिरंजीव झाले या. ते तुम्ही राष्ट्रवीरवर, या हो या सारे पोवाड्याच्या शेवटी शाहिराने त्वेषाने लिहले.*

अहो बंधूंनो! पूर्वज ऐसे स्वतंत्र रणगाजी स्वतंत्र त्या पूर्वजाशोभता वंशज का आजी?

क्रांतिकारक विचारसरणी मान्य असणाऱ्या तरुणांचे एक संमेलन १९०४ सालच्या मे महिन्यात नाशिक येथे भरविण्यात आले. तात्यांनी आपले विचार सडेतोडपणे मांडले 'मित्रमेळा' हे नाव बदलून 'अभिनव भारत' हे आकर्षक नाव देण्यात आले.

तात्यारावांचा अभ्यास सुरू होताच! बी. ए पास होऊन त्यांनी एल्. एल्. बी अभ्यास सुरू केला. 'विहारी' पत्राचे संपादकत्व पत्करले. लोकमान्य टिळकांचे सावरकरांनी लक्ष वेधून घेतले होते. टिळकांनी श्यामजी कृष्णा वर्मा यांचेकडे तात्यारावांची शिफारस केली. पं. वर्मांनी तात्यारावांना पुढील शिक्षणाकरिता इंग्लडला पाठविण्याचे ठरविले. वडिलधाऱ्या मंडळींचे आशीर्वाद घेऊन, तात्यारावांनी भारताचा किनारा सोडला.

*महत्कार्याचे कंकण धरिले । जाता महत्पदाला पाहिजे वाणले ।*
*ऐसे वर्तन पाहिजे केले । की जे पसंत पडेल संतांना ।।*

बोटीवर पाऊल ठेवल्यापासूनच तात्यारावांनी प्रचार कार्याला सुरुवात केली. विलायतेला जाणाऱ्या हुषार तरुणांना क्रांतिकार्याची दीक्षा देण्यास त्यांनी प्रारंभ केला. १९०६ च्या जुलै महिन्यात तात्यारावांनी इंग्लंडच्या भूमीवर पाऊल ठेवले. बॅरिस्टर होण्याकरता त्यांनी अभ्यासाला सुरुवात केली. इंग्लंडच्या वातावरणातील स्वातंत्र्याचा वारा ते मनोसक्त प्याले. लेखन - वाचनाला जोमाने सुरुवात झाली. वाचनालयात त्यांचे तासन्तास जाऊ लागले. इंडिया हाऊसमध्ये ग्रंथांचे त्यांनी परिशीलन केले.

याच दरम्यान १९०९ साली ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या विरुद्ध जनता तीव्र भावना व्यक्त करु लागली व त्यांचे वध करू लागली. व त्यामुळेच कर्वे, कान्हेरे व देशपांडे त्याचप्रमाणे खुदीराम बोस, कन्हैयालाल दत्त, सत्येंद्रनाथ बोस यांना फाशीच्या शिक्षा देण्यात आल्या. बाबाराव सावरकर यांना जन्मठेप झाली. बाळ सावरकरांनाही पकडण्यात आले. लोकमान्य टिळकांना सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा देण्यात आली. त्याचवेळी तात्यारावांची तब्येत ठीक नसल्याने त्यांनी फ्रान्सला हलवले होते. ते परत लंडनला आले. तेव्हा तात्यारावांनादेखील अटक केली. परंतु 'मोरिया' बोटीतून हिंदुस्थानकडे येताना बोटीच्या पोर्टहोलमधून 'मार्सेलिस' बंदरात येताना समुद्रात उडी टाकली. ते झपाट्याने पाणी कापीत किनाऱ्यावर आले. परंतु फ्रेंच पोलिसांनी त्यांना इंग्रजांच्या ताब्यात दिले. ही उडी त्रिखंडात गाजली. तेव्हा सावरकरांना जबरदस्त शिक्षा होणार हे नक्की झाले. व सावरकरांना मृत्यूलोकी म्हणजे अंदमानला पाठवण्याचे निश्चित केले. तात्यारावांचे प्रतिभाशाली मन या प्रतिकूल वातावरणातही कार्यक्षम राहिले. त्यांना लेखन - साहित्य मिळण्यासारखे नव्हते. लोखंडी खिळ्याने किंवा धायपाताचा काटा घेऊन तात्याराव तुरुंगाच्या भिंतीवर कोरू लागले. कमला हे महाकाव्य त्यांनी कोरले होते. नंतर अनेक नेत्यांच्या प्रयत्नांमुळे तात्यारावांची दि. ६ जानेवारी १९२४ रोजी सुटका झाली.

हिंदूसमाजाचे ऐक्य व्हावे, म्हणून सहभोजनाची चळवळ सुरु केली.

"तुम्ही आम्ही सकल हिंदू । बंधूबंधू
तो महादेवजी पिता आपला चला तया वंदू"
हे गीत लोकप्रिय झाले. हे गीत सावरकरांनीच रचले.
हे मातृभूमि तुजला मन वाहियले ।
वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियले ।
तू तेचि अर्पिली नवी कविता रसाला ।

पांडित्य व प्रतिभा यांचा अपूर्व संगम म्हणजे सावरकर. सावरकरांची प्रतिभा महाकवींची होती. बालवयातच त्यांची प्रतिभा उमलू लागली. तिचा विकास झाला. ओज व दुर्दम्य आशावाद त्यांच्या साहित्यात प्रकर्षाने आढळतात. वीर रसालाच त्यांनी प्राधान्य दिलेले आढळते. वाङ्मयाच्या सर्व क्षेत्रांत सावरकरांच्या लेखणीने संचार केला म्हणजे दिव्य प्रतिभेची प्रतीके आहेत. त्यांच्या अन्य कविताही स्फूर्तिदायक आहेत.

'सहा सोनेरी पाने' वैभवशाली इतिहासाची साक्ष देतात. त्यांनी 'उःशाप', 'संन्यस्त खड्ग' 'उत्तर क्रिया' ही तीन नाटकेही लिहली. त्यांचे आत्मचरित्रही तेजस्वी आहे.

सावरकरांच्या लेखनावर मात करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अमोघ वक्तृत्वात आढळते. सावकरांचे वक्तृत्व म्हणजे प्रत्यक्ष विद्युल्लतेचा साक्षात्कार! सागराची गंभीर गर्जना! मोराच्या पिसाऱ्याचे मनोवेधक सौंदर्य! राजहंसाची डौलदार चाल! सिंहाचा आवेश! गरुडाची झेप! जणू तळपती समशेर! सरस्वतीची अमृतवाणी! जाज्वल्य देशाभिमान! तर्कशुद्धता व भावना यांचे अपूर्व मिश्रण!

सुटकेनंतर तुफानी वक्तृत्वाने शेकडो लोकांना तात्याराव सावरकरांनी मंत्रमुग्ध केले. तात्यारावांचा अनेक ठिकाणी सत्कार होऊ लागला. अशाच एका स्वातंत्र्य समारंभात त्यांना 'स्वातंत्र्यवीर' ही पदवी दिली. नंतर १५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाला. स्वातंत्र्यवीरांना 'याच देहि याच डोळा' पहिल्याचा आनंद झाला.

*अशीच सर्व फुले खुडावी । श्रीरामचरणी अर्पण व्हावी*
*काही सार्थकता घडावी । या नश्वर देहाची ।।*

भारत स्वतंत्र झाला. सावरकर राजकारणातून निवृत्त झाले. कोणताही मोह, अभिलाषा न धरता ते अलिप्तपणे बाजूला झाले. १९६६ सालच्या फेब्रुवारी महिना उजाडला. सावरकर आजारी झाले. जगण्याची कोणतीही इच्छा न उरल्याने ते भीष्माप्रमाणे महानिर्वाला सिद्ध झाले. योगिराजाप्रमाणे जिवंत समाधी घेण्याचा त्यांनी निश्चय केला. शांत मनाने, दि. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकरांनी आत्मार्पण केले. महान आत्मा पंचतत्वात विलीन झाला.

**गार्गी अष्टेकर**
४०१, अश्वमेध, भास्कर कॉलनी
नौपाडा, ठाणे ४०० ६०२

●●●

आपल्या मुलीने-मुलानं मोठं व्हावं म्हणून कुणाची साथ नसताना, शिक्षणासाठी पोषक वातावरण नसतानासुद्धा ग्रामीण भागात अनेक आया काबाडकष्ट करतात. आपण जगतोय त्यापेक्षा सुंदर आयुष्य आपल्या मुलाला-मुलीला बहाल करावयं, या इच्छेनें उन्हा-पावसात सतत राबत असतात. प्रकाशझोतापासून दूर असणाऱ्या त्या तमाम माउलींनाही आपण शतशः प्रणाम केले पाहिजेत.

## चिंतन

संस्था ही कोणतीही असो,
सरकारी, सहकारी, खाजगी वा धर्मार्थ,
संस्थेत ठराविक काम करणे,
हा झाला कायदा.
पण कामात स्वतःला झोकून देणे,
ही झाली नैतिकता.
मी पगार घेतो म्हणून काम करतो,
हा झाला व्यवहार.
संस्थेच्या अस्तित्वाची, सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे,
ही झाली आपुलकी.
संस्थेची प्रगती आहे तोवर माझे अस्तित्व कायम आहे.
माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला हानिकारक ठरेल,
अशी कृती मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेने,
स्वतःला कामात वाहून घेईन.
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच देशाचा विकास व स्वतःचा उद्धार आहे.

# बालकांड

*रामचरितमानस या ग्रंथाचा प्रभाव आजही मोठ्या प्रमाणात भक्तांवर आहे. त्या निमित्ताने काही शोधावे या नम्र भूमिकेतून प्राचार्य मुजुमदार सरांनी लेख लिहिले आहेत. त्यातील हा दुसरा लेख*

बालकांडाची सुरुवात अक्षरे, अर्थसमूह, विविध रस छंद आणि मंगलकारक श्री सरस्वती देवी आणि गणेशजींना वंदना करून झाली आहे.

यांच्या स्मरणांशिवाय आपल्या अंत:करणात स्थिर श्रद्धा आणि विश्वासाचे स्वरूप येऊ शकत नाही. श्री पार्वतीमाता आणि शंकरजींनी वंदन केले आहे. त्याच्या आश्रयाला आल्यामुळे वाकड्या अर्धचंद्रकोरीला सुद्धा वंदन केले जाते. श्रीसीता रामजी ह्यांच्या गुणगानात सदा विहार करणाऱ्या विशुद्ध आणि विज्ञानरूप कवीश्वर श्री वाल्मिकऋषी आणि कपिश्वर श्री हनुमानजींना मानवंदना दिली गेली आहे.

उत्पत्ती स्थिती व संहार करणारी, दु:खाचा नाश करणारी व सर्व कल्याण करणारी प्रभु रामचंद्रांची प्रियतमा श्री सीता माई यांना वंदन आहे. ज्यांच्या मायेत सर्व विश्व, सुर, असुर तसेच राध्या दोरीत सुद्धा साप असल्याचा भ्रम व्हावा तसा सर्व जग सत्य असल्याचा भास होतो, भवसागर तरण्यासाठी ज्यांचे पायच केवळ एक मात्र नाव आहे व या सगळ्यापेक्षाही ते वेगळे व श्रेष्ठ आहेत त्या **'हरी नामक'** भगवंताला वंदन असो. अनेक पुराण, वेद, शास्त्र तसेच इतर रामकथांमध्ये वर्णित आणि इतरत्र उपलब्ध श्री रघुनाथजींच्या कथा वर्णनांचा आधार घेत आपल्या अंत:करणाच्या सुखासाठी श्री तुलसी दास अत्यंत मनोहर भाषा रचनेमध्ये हे चरित्र प्रस्तुत करीत आहेत.

ह्या ठिकाणी ''स्वान्त: सुखाय तुलसी रघुनाथ गाथा'' हे फार महत्त्वाचे आहे. स्वत:च्या सुखासाठी सर्व वेद पुराण इत्यादी कथा ऐकून भाषाबद्ध रामायण त्यांनी लिहलं. ज्यांच्या स्मरणाने सर्व कार्य सिद्ध होते ते हत्तीचे तोंड असलेले श्री गणेश माझ्यावर कृपा करोत. ज्यांच्या कृपेने मुका मनुष्य बोलका होऊ शकेल किंवा लंगडा मनुष्य अत्यंत कठीण पहाड चढून जाऊ शकतो; तसेच सर्व पापांचा नाश करणारे दयाळू परमेश्वर सर्वांवर दया करो.

निळ्या कमळासारखा श्यामवर्ण असलेले व कमलनयन असणारे, नेहमी क्षीरसागरावर वास्तव्य असणारे भगवान नारायण माझ्या हृदयात विराजमान होवोत, कुंदाच्या फुलासारखे व चंद्रासारखा गौरवर्ण पार्वतीचे प्रियतम, दीन जनांवर प्रेम करणारे श्री. शंकर भगवान माझ्यावर कृपा करोत कृपेचा सागर आणि मनुष्य रुपी श्री. गुरु महाराजांनी वंदना केलेली आहे. पुढल्या सर्व चौपाईत गुरुचरणांची विभूती त्यांच्या वेगवेगळ्या उपमा, त्यामुळे होणारे लाभ त्यापासून मिळणाऱ्या दिव्य दृष्टीचे वर्णन श्री तुलसीदासजी करतात.


ज्याप्रमाणे सिद्धांजन दिव्य दृष्टीने साधक आणि सुजाण माणसे पर्वतात लपलेल्या मण्यांच्या खाणी बघू शकतात. त्याचप्रमाणे गुरूच्या पदांच्या रजरूपी सुंदर नयनामृत अंजन घालून संसाररूपी बंधनापासून मुक्त करणाऱ्या श्री रामचरित्राचे वर्णन करतो. तुलसीदास नंतर संताच्या आणि ब्राह्मणांच्या चरणास वंदन करतात. संतांचे वर्णन असे आहे की, स्वत: दु:ख सहन करून दुसऱ्याचे दोष झाकण्याच्या वृत्तीचे कापसाच्या उपमेने केले आहे.

प्रत्येक जण जग बदलण्याचा विचार करतो; मात्र कोणीही स्वत:ला बदलण्याचा विचार करीत नाही. - लिओ टॉलस्टॉय

### '' जो सहि दुख परछिद्र दुरावा''

कापूस जसा पिंजून, सूत कातून, विणून इत्यादी क्रिया पार पडून धाग्याच्या रूपात तयार होऊन दुसऱ्यांचे गोपनीय अंग झाकतो. तसेच संत स्वत: दु:ख सहन करून दुसऱ्यांना सुख देतात, म्हणूनच ते वंदनीय होतात.

संतांचा मंगलमय सहवास हा तीर्थराज प्रयागासारखा सुखद आहे. राम भक्ती ह्या तीर्थराज प्रयागात गंगेच्या निर्मल प्रवाहासारखी आहे. हरी आणि हर ह्यांची कथा ह्या अत्यंत आनंददायक आहे, मंगलकारी आहे. या तीर्थराजांत अटळ विश्वासपूर्वक ह्या कथांचे श्रवण केल्यास सर्व क्लेशाचे निवारण तर होतेच हा त्याचा प्रकट प्रभाव दिसून येतो. हे सर्व समजून सर्व साधू समाज व सर्व लोक यात आनंदाने आणि प्रेमाने स्नान करतात व जीवनांतील चारही (अर्थ, धर्म, काम आणि मोक्ष) फळांची प्राप्ती करतात.



पुढील आठ चौपाईंत संतांच्या संगतीचे महत्त्व आणि त्याच्या फळांचे वर्णन केले आहे. ह्या निर्मल प्रयागांत स्नान करताच त्याचे फळ तावडतोब मिळते. कावळ्याचे कोकिळेत तर बगळ्याचे हंसात रूपांतर होते. ह्याबद्दल कोणी आश्चर्य करू नये कारण सतसंगतीचा महिमा अगाध आहे. वाल्मिकी ऋषी, नारद ऋषी ह्यांनी स्वत: तो अनुभवला आणि कथनही केला आहे वेद आणि इतर सर्वांनीही संतसंगतीच्या प्रभावाने वर्णन केले आहे.

संतसंगाशिवाय विवेक येत नाही आणि विवेकाशिवाय रामकृपा सुलभ होत नाही. म्हणून संत संग हे सर्व सिद्धीचे सुगम साधन आहे. संतसंगतीत दुष्ट लोक सुधारून जातात. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोन्यात रूपांतर होते. दैवयोगाने सज्जन वाईट संगतीत पडले तरी स्वत:चे गुण विसरत नाही. उदा. मणी जरी सापाच्या जवळ राहिला तरी तो जहराप्रमाणे न वागता स्वत:चा प्रकाश देण्याचा स्वभाव सोडत नाही. ब्रह्मा, विष्णू, महेश, कवी इत्यादी सुद्धा साधूंचा महिमा सांगण्यात संकोच करत नाहीत. तेव्हा माझ्या सारख्या भाजी विकणाऱ्या माणसाला मणी आणि माणिक ह्यांचे सारखाच सुगंध त्याचप्रमाणे संत लोकांचे मन त्यांचे हित अथवा अहित करणाऱ्या माणसांच्या बाबतीत समान असते. संतांचे चित्त जगाचे हित करण्यातच लागले असते. जे जाणून मी माझ्या बालबुद्धीने त्यांना कृपा करून मला रामचरणात प्रेम देण्याची विनंती करत आहे.

त्यानंतरच्या दोह्यांत दुर्जन (खल, वाईट) लोकांचे लक्षण वर्णन केले आहे. दुसऱ्याच्या अहिताची इच्छा करणारे दुसऱ्याचे भले झाल्यामुळे स्वत: दु:खी होणारे, दुसऱ्याचे काम वाईट करण्यासाठी सहस्त्रबाहू सारखे जहाल हात धारण करणारे आणि इतरही खूप अवगुण असणाऱ्या दुर्जनांचे लक्षण श्री तुलसीदास महाराजांनी सांगितले आहेत. त्यापैकी ही लक्षणे आपल्यात किती आहेत व किती नाहीत याचा प्रत्येकानेच विचार विचार करायचा आहे. मला स्वत:ला तर बऱ्याच अवगुणांनी मी समृद्ध दिसतो. पण त्यांतील काही अवगुण खरंच त्यागण्यासारखेच आहेत. कमीत कमी ते तरी आपण टाकू शकतो. एका चौपाईत ते लिहतात.

---

स्वत:च्या दोषांचे भान नसणे हाच मनुष्यातील सर्वात मोठा दोष आहे.

पर अकाजु लगि तनु परिहरही।
जिमि हिम उपल कृषी दलि गरही।।

ज्याप्रमाणे "गारा" शेतांत पडून शेतातील पिकांचा नाश करतात व स्वत:चाही नाश करून घेतात, त्याप्रमाणे दुर्जन लोक दुसऱ्यांचे कार्य असफल करण्याकरिता स्वत:च्या शरीराचाही नाश करण्यास तयार असतात. मला स्वत:ला हे योग्य वाटत नाही. आपण दुसऱ्याच्या कार्यात मदत करण्याची तयारी दाखवत नसलो तरी, त्याच्या सफल होणाऱ्या कामांत अडथळा न आणणे हेच श्रेष्ठ. आपण कुणाचे भले करू शकलो नाही, तर कमीत कमी त्याचे वाईट करण्यात आपला सहभाग नसावा.

दुष्टांची अशी रीत असते की ते उदासीन, मित्र अथवा शत्रू यांचे चांगले झाल्याचे ऐकून ते जळतात. हे जाणून मी त्यांना हात जोडून प्रितीपूर्वक वंदन करतो. पण त्यांना प्रेमपूर्वक मी वंदन करून सुद्धा ते त्यांच्याकडून सुधारणा नाही. कावळ्याला कितीही प्रेमाने पाळले तरी तो मांस खाणे सोडत नाही. तसेच दुष्ट लोक आपला उपजत स्वभाव बदलत नाही. संत आणि असज्जन या दोघांच्या चरणाची मी वंदना करतो, कारण दोघेही दु:ख देणारेच आहेत. एकाचा वियोग तर दुसऱ्याशी मिलन हे दु:खदायकच असते. उदाहरणादाखल वेगवेगळ्या सज्जन दुर्जनांची नावे दिली आहेत. उदा. अमृत, दारू, साधु - असाधु, कमळ-जळू इत्यादींचा एकाच ठिकाणी जन्म होऊनही आपापल्या करणीने ते जगात यश अथवा अपयशाची संपत्ती प्राप्त करतात. अमृत, चंद्र, गंगा नदी आणि साधू तसेच विष, अग्नि, कर्मनाशी नदी आणि हिंसा करणारा व्याध यांचे गुण अवगुण सर्वच जाणतात; परंतु ज्याला जे आवडते तेच त्याला चांगले वाटते. चांगला माणूस चांगुलपणाचे ग्रहण करतो व नीच माणूस नीचतेचे ग्रहण करतो. अमृताचे प्राशन अमरता देण्यातच असते तर विष हे ठार मारण्यातच विशेषता मानते.

वाईट लोक अवगुणांचे, तर साधु लोकांच्या कथा ह्या समुद्राप्रमाणे अपार आणि अथांग आहेत. वास्तव त्यांच्या काही गुणांचे व दोषांचे वर्णन केले आहे. हे ज्ञान असल्याशिवाय त्यांचे ग्रहण अथवा त्याग होऊ शकत नाही. चांगले वाईट ब्रह्मदेवांपासूनच उत्पन्न झाले आहेत. ब्रह्मदेवाची सृष्टी गुण आणि अवगुण यांनी भरलेली आहे. असे वेद सांगतात ब्रह्मदेवाच्या सृष्टीत असणाऱ्या वेगवेगळ्या गुणदोषांच्या गोष्टींचा विचार करून त्यांने विभाजन केले आहे. उदा. पाप-पुण्य, स्वर्ग - नरक, देव - दानव राजा - रंक इत्यादी. ब्रह्मदेवाने निर्माण केलेले जड चेतन विश्व गुण दोषमय आहे परंतु संतरूपी पाण्याचा त्याग करून पुण्यरूपी ग्रहण करतात.

विधाता जेव्हा हंसासारखा विवेक देतो, तेव्हा दोषांचा त्याग करून गुणांत मन रममाण होते. काल आणि कर्मांमुळे साधुलोक सुद्धा चांगुलपणा करण्यापासून परावृत होतात. हरीचे भक्त हे चूक सुधारून दु:ख आणि दोषांना समाप्त करून निर्मळ यश मिळवतात. पण वाईट व्यक्ती चांगली संगती मिळून सुद्धा आपला मलीन स्वभाव सुधारत नाहीत. त्यांचा चांगला वेष पाहून जग त्यांची पूजा करते. पण शेवटी त्यांचे बिंग फुटताच त्यांचे कपट उघड होते. रावण आणि राहू ह्यांचे हेच हाल झाले. वाईट वेष असणाऱ्या हनुमान आणि जांबुवंताचा जनाने सन्मानच केला. कुसंगात राहून होणारी हानी आणि सुसंगात राहिल्याने वाऱ्या बरोबर उडत जाणाऱ्या मातीचे आकाशांत उड्डाण होते तर त्याच मातीचा पाण्याशी संग होताच चिखलात रूपांतर होते.

**प्राचार्य श्री. मुजुमदार**
१०४, प्लॉट सी २,
इमारत क्र. ३ सी एन. जी. रॉयल पार्क,
कांजुरमार्ग, मुंबई ४०००४२
भ्रमणध्वनी : ९७६९३१०७४६

●●●

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर प्राथमिक विभाग

**स्वागत :**

१५ जून रोजी २०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता १ ली ते ४ थी चे वर्ग मोठ्या उत्साहात सुरू झाले. इयत्ता १ली च्या विद्यार्थ्यांचे खास स्वागत करण्यात आले.

**मोफत पाठ्यपुस्तक वाटप :**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत शासनाने दिलेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप १५ जून रोजी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. बसवराज बन्ने सर व समितीचे इतर सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या वेळी मा. मुख्याध्यापिका सौ. विजया भंडारे, सह शिक्षिका सौ. सीमा रजपूत, सौ. मनिषा गोखले ह्या उपस्थित होत्या.

**आषाढी एकादशी (बालदिंडी) :**



**२९ जून २०१२ - इ. १ ली ते ४ थी आषाढी एकादशीचे बालवारकऱ्यांची दिंडी**

२९ जून रोजी प्राथमिक विभागातील इ. १ली ते इ. ४ थी च्या बाल वारकऱ्यांची दिंडी काढण्यात आली. दिंडीसाठी जमलेल्या सर्व विद्यार्थ्यांना एकादशीचे महत्त्व, वारकरी सांप्रदायाची माहिती व विठ्ठल महिमा शिक्षकांनी कथन केला. विठ्ठल-रुक्मिणी यांची पूजा करण्यात आली. टाळ -मृदुंगाच्या गजरात व विठ्ठलाच्या नामात अवघे विद्यामंदिर दुमदुमले. शेवटी आरती करून विद्या चांगली दे, चांगले संस्कार आमच्यावर होऊ दे अशी प्रार्थना सर्वांनी केली.

**गुरुपौर्णिमा :**



**३ जुलै २०१२ - गुरुपौर्णिमा उपक्रम इ. १ ली ते ४ थी**

३ जुलै रोजी इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांचा 'गुरुपौर्णिमेचा' कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात प्राथमिक विभागाच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. घोरपडे, सौ. रजपूत, सौ. कटके व सौ. फिरके यांनी गुरु-शिष्य परंपरा, गुरू कोणास म्हणावे इ. चे महत्त्व खुमासदार शैलीत विद्यार्थ्यांपुढे मांडले. विद्यार्थ्यांनी गोष्टी, मनोगत व गाण्यातून गुरुभक्ती सादर केली.

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर माध्यमिक विभाग

१ फेब्रुवारी रोजी स्काऊट गाईड आयोजित आनंद मेळावा साजरा करण्यात आला.

---

मोठी माणसं वैचारिक चर्चा करतात, सामान्य माणसं प्रासंगिक चर्चा करतात आणि संकुचित विचारांची माणसं वैयक्तिक चर्चा करतात.

१३ फेब्रुवारी रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा समारंभ साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी राजस व मानस काळे (विमान चालक) उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून वि. प्र. मंडळाचे सदस्य व प्रसिद्ध गझलगायक श्री. अनिरुद्ध जोशी उपस्थित होते. १० अ मधील त्रिशला पवार, मृदुला, तुषार या विद्यार्थ्यांनी राजस व मानस यांच्याशी मुलाखतरूपाने संवाद साधला.

१३ फेब्रुवारी रोजी राजस व मानस काळे यांच्या हस्ते पारिजातक प्रकाशन करण्यात आले.

१ मे रोजी महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विनायक जोशी हे उपस्थित होते.

दि. १ मे रोजी माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला. आपल्या शाळेचा निकाल ६७% लागला असून ऋतुजा काबाडी जिल्ह्यात (१५ वी)२५०/३०० आकाश वाघ (जिल्ह्यात २७ वा ) २२६/३००, रोशनी दिघे (जिल्ह्यात २९ वी) २२६/३०० या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

## सौ. आनंदीबाई जोशी प्राथमिक विभाग

आषाढी एकादशीच्या दिवशी प्राथमिक विभागाच्या चौथीच्या विद्यार्थ्यांनी वारकरी सांप्रदायाची परंपरा कायम ठेवत शिस्तबद्ध रीतीने 'शिस्त दिंडीचे' आयोजन केले. शिस्तीचे जीवनातील महत्त्व पटवून घेत इतरांनाही हा संदेश दिला. हरिनामाचा गजर करून बाळगोपाळांनी दिंडी घेऊन शाळेला प्रदक्षिणा घातली. विठोबा रखुमाईच्या पायी संतमंडळी जमा झाली. तसेच वारकऱ्यांनी रिंगण करून गजर केला व आपल्या अंगभूत कलांचे प्रदर्शन केले. फुगड्या कोलांट्या उड्या गाठोडी वगैरेनी सर्वांचे मनोरंजन केले. 'शिस्त' ह्या दिंडीच्या विषयावर बाळगोपाळांनी कीर्तन केले. विठूच्या गजराने तसेच पांडुरंगाच्या आरतीने लाडवांचा महाप्रसाद घेऊन दिंडीची सांगता केली.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरुविषयी असलेला आदरभाव दर्शवीत प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'एकलव्य' ह्या गुरू व शिष्याची गोष्ट नाटकाद्वारे सादर केली. तसेच, श्लोकांद्वारे सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली.



'एकलव्य' मधील कलाकार



शिस्तदिंडी

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल

मार्च २०१२ मध्ये आयोजित पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत एकूण ७४ विद्यार्थी बसले होते. त्यांतील १७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली. शाळेचा निकाल

९५.९४% लागला. त्यात यश देशपांडे हा ठाणे विभागातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.



सौ. ए. के जोशी इंग्लीश मिडियम स्कूल ठाणे, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीधारक



सौ. ए. के जोशी इंग्लीश मिडियम स्कूल ठाणे, माध्यमिक शिष्यवृत्तीधारक

खालील विद्यार्थ्यांना शहरी विभागातून शिष्यवृत्ती मिळाली.

| | | |
|---|---|---|
| १. | सांगलीकर सोहम प्रशांत | ८ वा |
| २. | कोकणे यश संदिप | ९ वा |
| ३. | सचदेव सरगुनदिप कौर | ९ वी |
| ४. | भिडे पूर्वा गिरिश | १३ वी |
| ५. | बोरकर विश्वराज मंदार | १३ वा |
| ६. | शिंपी सोहम आशिष | १३ वा |
| ७. | हिरवे अथर्व मदन | १४ वा |
| ८. | गोडबोले वरूण योगेंद्र | १६ वा |
| ९. | वरूण मिहाल राजकुमार | १६ वा |
| १०. | भाटे तेजस सचिन | १७ वा |
| ११. | पवार जागृति कुंदन | १७ वा |
| १२. | बालावलकर प्रथमेश राजेंद्र | १७ वा |
| १३. | काणे वरद विश्वनाथ | १८ वा |
| १४. | देवधर अदिती हेमंत | १९ वी |
| १५. | लागू श्रावणी राकेश | २० वी |
| १६. | गोरे रिषभ प्रकाश | २१ वा |

## विधी महाविद्यालय

विधी महाविद्यालयाने १५ जून रोजी ४० वर्षे पूर्ण केली आहेत. कै. डॉ. वा. ना. बेडेकर, कै. गुणाकर जोशी, श्री. श्री. वि. करंदीकर, कै. रा. कृ. गोखले आदी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी या कामी खूप मेहनत घेतली होती. ४० वर्षांचा इतिहास आज आठवताना 'आपलं लॉ कॉलेज ४० वर्षांचं झालं' यावर विश्वासच बसत नाही. ॲड. प्रदीप टिल्लू, गजानन चव्हाण, आकाराम चव्हाण अशी विविध वकील मंडळी याच महाविद्यालयातून 'वकील' झाली.

विधी महाविद्यालयाची प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया चालू आहे.

## विद्या प्रसारक मंडळ

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय गणेश पूजन व वास्तु प्रवेश

दि. २४ एप्रिल २०१२ रोजी अक्षय तृतीया आणि महर्षी परशुराम यांची जयंती होती. विद्या प्रसारक मंडळाच्या देदीप्यमान वाटचालीतील व कोकणाच्या शिक्षण क्षेत्रातील हा दिवस ऐतिहासिक ठरला.

हेदवी-गुहागर रस्त्यावरील मंडळ ३५ एकर जमिनीवर अत्यंत आधुनिक सोयींनी युक्त असलेल्या मंडळाच्या महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाचा वास्तुप्रवेश या दिवशी झाला. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय वासुदेव बेडेकर व सौ. सुमेधाताई बेडेकर यांच्या हस्ते गणेशपूजन आयोजित करण्यात आले होते.



नवीन इमारत

सदर मंगल प्रसंगी विद्याप्रसारक मंडळाचे विश्वस्त श्री. श्रीनिवास जोशी उपस्थित होते. कार्यवाह अुत्तम जोशी, कोषाध्यक्ष मा. य. गोखले यांसह मंडळाच्या कार्यकारिणीचे इतर सदस्यही उपस्थित होते.

विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाहक प्रमुख श्री. रसाळ, अन्य सेवाधिकारी, शिक्षक, महाविद्यालयातील अनेक अध्यापक या कार्यास सक्रिय हातभार लावत आहेत.

२४ एप्रिल याच दिवशी अणुउर्जा आयोगाचे अध्यक्ष महाराष्ट्र भूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी प्रकल्पास भेट दिली व एक दिवस राहून सर्व माहिती करून घेतली.

●●●

**या अभियांत्रिकी महाविद्यालयातील मधील पत्रकार भेटीसंबंधीचे वृत्त वेळे अभावी मागे राहत आहे लवकरच मंडळाच्या या कार्यक्रमाचे वृत्तही परिसर वार्तात घेण्याचा प्रयत्न आहे.**

## वृद्धापकाळ निरोगी होण्यासाठी सोपे उपाय

- संतुलित आहार घ्या शरीराला फळे आणि भाज्या योग्य प्रमाणात मिळायला हव्यात.
- स्वतःला कफापासून वाचवा. कारण कफ हे अनेक रोगांचे घर आहे.
- वाटल्यास दररोज रात्री झोपण्यापूर्वी एक कप गरम दूध घ्या.
- नियमित व्यायाम करा. सकाळी-संध्याकाळी जवळच्या बागेत फिरायला जा. तथापि, व्यायाम डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच करा.
- वैद्यकीय तपासणी नियमित करून घ्या. नियमित तपासणीबरोबरच आवश्यकता भासल्यास औषधे घेत रहा.
- मुले आणि आपलं कुटुंब यांच्यामध्ये राहा. संध्याकाळची वेळ मुलांबरोबर घालवा आणि आपल्या कुटुंबासाठी सहाय्यक बना.

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वात कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवींसाठी आवाहन:**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवींचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवींसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

•••

# स्वप्न साकारत आहे...



हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंतांरी मनोरथाचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे सुखासक्तांचे, नव्हे ते अल्पमितींचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासी मन त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणी, न एका दिनी,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्राजागृती तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता ज्याची महान, सीमा ज्याची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनी सुस्वागत अमुते करिता
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -
ओसाड भूमी कर्दमी जिथे पाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न ज्या कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य ज्यांचे महान,
शिल्पही ज्यांचे विलोभनीय देखिती
मनी ते सुजाण.

दृश्य देखतां वाटे भव्यता, प्रासाद जणू सारस्वतांचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलफुलांचे रंगांगती,
उद्यानी बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मन पोळके, स्वप्न रंगवितां मन जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथे रंगती
विज्ञानसत्री सदा ज्यांची वाहिली मती,
कलावंत, सारस्वतांचे तज्ज्ञ, तसे वैज्ञानिक महान,
इथे जन्मली प्रतिभा ज्यांची देदीप्यमान
भूदल-नाविक-सैनिक, वायुदली इथे निर्मिती
शक्तियुक्ति ज्यांची भारतमातेप्रती
स्वमान्य, स्वनागरिक, प्रज्ञावंत इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर ज्यांचे अंतरंगी वसे.
बालके नव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयांची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि ज्याची, शक्ति ज्याची भारतभूचा ठेवा

- डॉ. वा. ना. बेडेकर